राज्यात आरोग्य यंत्रणेच्या सर्वंकष व्हिजनसाठी समिती

मुंबई : राज्यातील आरोग्य यंत्रणा मजबूत करण्यासाठी युद्धपातळीवर पाऊले टाकण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी (दि. ९) दिले. येत्या पंधरा दिवसांत सचिवांच्या समितीने नवीन वैद्यकीय महाविद्यालयांच्या जोडीने राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये सर्व सुविधांयुक्त जिल्हा रुग्णालये उभारण्याबाबत आराखडा तयार करण्याचे सांगतांनाच वर्ष २०३५पर्यंत आरोग्य आणि वैद्यकीय शिक्षणाचा विचार करून राज्यासाठी एक आरोग्याचे सर्वंकष व्हिजन तयार करण्यासाठी तज्ज्ञांची एक समिती नेमण्याचेही निर्देश त्यांनी दिले. राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेबाबत सोमवारी मंत्रालयात घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीदेखील या वेळी आरोग्यावरील गुंतवणूक, पदभरती याबाबत सुचना दिल्या.

रायगड, नवी मुंबई

राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक ८३
www.ramprahar.com

मंगळवार, १० ऑक्टोबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयाची राज्यात प्रभावी कामगिरी/३

अलिबागमध्ये १५ जणांना कुत्र्याचा चावा; उपचार सुरू/५

हिवताप, डेंग्यू रोखण्यासाठी नवी मुंबईत विशेष मोहीम /६

तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी ५३१ कोटींची मान्यता

मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली शिखर समितीच्या बैठकीत निर्णय

मुंबई : प्रतिनिधी

राज्यातील तीर्थक्षेत्रांच्या विकास आराखड्यास मान्यता देण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीची सोमवारी (दि. ९) बैठक झाली. या बैठकीत श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योर्तिलिंग विकासाच्या २८६.६८ कोटी रुपयांच्या सुधारित विकास आराखड्यास तसेच श्री क्षेत्र घृष्णेश्वर तीर्थक्षेत्राच्या सुधारित १६३ कोटी आणि श्री क्षेत्र सप्तशृंगी देवी या तीर्थक्षेत्राच्या ८१.८६ कोटीच्या सुधारित आराखड्यास मान्यता देण्यात आली.

मंत्रालयात झालेल्या शिखर समितीच्या या बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषीमंत्री धनंजय मुंडे, आमदार प्रशांत बंब, मुख्य सचिव मनोज सौनिक, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. गोविंदराज, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, बीड जिल्हाधिकारी दीपा मुधोळ आदी उपस्थित होते.

श्री क्षेत्र परळी येथील तीर्थक्षेत्र विकास आराखड्यामध्ये ९२ कामांना नव्याने प्रशासकीय मान्यता देण्यात आली. या वेळी आराखड्यानुसार करण्यात येणाऱ्या कामांचे सादरीकरण करण्यात आले. मंदिराच्या मागील बाजूच्या जागेवर लाईट आणि साऊंड शो करण्यात येणार आहे. लेझर शो करताना नागरिकांच्या डोळ्यांना इजा होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक असल्याचे मुख्यमंत्र्यांनी या वेळी आवर्जून सांगितले.

सोयीसुविधांबाबत निर्देश

तीर्थक्षेत्री येणाऱ्या भाविकांना चांगल्या सोयीसुविधा देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने दक्षता घ्यावी आणि परिसरात पर्यटनवाढीसाठीदेखील प्रयत्न करावेत, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या वेळी दिले.

श्री क्षेत्र घृष्णेश्वर विकास आराखड्यामध्ये वळण रस्ता प्रस्तावित करण्यात आले आहे. लेणी क्रमांक एक ते महादेव मंदिर हा नविन रस्ता १.६५० किमीमी लांबीचा असून त्यासाठी २७.५८ कोटी खर्च अपेक्षित असल्याचे या वेळी सांगितले. **(पान २ वर..)**

मध्य प्रदेशसह पाच राज्यांतील विधानसभा निवडणुका जाहीर

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

भारतीय निवडणूक आयोगाने सोमवारी (दि. ९) पाच राज्यांच्या निवडणुकांच्या तारखा जाहीर केल्या आहेत. २०२४च्या लोकसभा निवडणुकीआधी मिझोराम, छत्तीसगड, मध्य प्रदेश, राजस्थान आणि तेलंगणा या राज्यांमध्ये विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. याबाबतचे वेळापत्रक निवडणूक आयोगाने जाहीर केले.



मिझोराममधून १३ ऑक्टोबरपासून निवडणूक प्रक्रिया सुरू केली जाणार आहे. सर्व पाच राज्याच्या विधानसभा निवडणुकीची मतमोजणी ३ डिसेंबर रोजी केली जाणार आहे.

मिझोराम विधानसभा निवडणुकीचं मतदान ७ नोव्हेंबर घेतलं जाणार आहे. तर छत्तीसगडमध्ये दोन टप्प्यात निवडणूक प्रक्रिया राबवली जाणार आहे. दरम्यान, मध्य प्रदेश- १७ नोव्हेंबर, राज्यस्थान -२३ नोव्हेंबर आणि तेलंगणात ३० नोव्हेंबर रोजी मतदान घेतलं जाणार आहे, ही माहिती निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त राजीव कुमार यांनी दिली. पाचही राज्यांच्या निवडणुकांची मतमोजणी ३ डिसेंबरला घेतली जाणार आहे. ५ डिसेंबरपर्यंत सर्व निवडणूक प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

रो-रो बोटीतून प्रवासी पडला समुद्रात

मांडवाजवळील घटना; शोध सुरू

अलिबाग : प्रतिनिधी

मुंबई-मांडवा रो-रो बोटीने प्रवास करीत असताना एक प्रवासी मांडवा जवळील समुद्रामध्ये पडला. नैमुद्दीन चौधरी असे या प्रवाशाचे नाव आहे. नैमुद्दीन अद्याप सापडला नाही. पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

सोमवारी (दि. ९) सकाळी ८ वाजता रो-रो बोट मुंबईहून मांडव्याला (अलिबाग) यायला निघाली. बोट मांडाव्याजवळ आली असता या बोटीतून प्रवास करणारा नैमुद्दीन चौधरी समुद्रात पडला.

या घटनेची माहिती मिळताच रायगडचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार अलिबाग उपविभागीय पोलीस अधिकारी अरुण भोर, मांडवा पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी सह्यक पोलीस निरीक्षक गोविंद पाटील व मांडवा पोलीस ठाण्यातील त्यांचे सहकारी मांडवा बंदर येथे पोहचले.

शासकीय स्पीड बोट, खासगी स्पीड बोट व स्थानिक मच्छिमारांच्या सहा बोटी घेऊन मांडवा बंदर परिसरात नैमुद्दीन चौधरी याचा शोध घेण्यास सुरुवात केली. तो अद्याप सापडला नाही. पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उद्या पनवेलमध्ये

पनवेल : रामप्रहर वृत्त

महाविजय २०२४च्या अनुषंगाने भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा बुधवारी (दि. ११) पनवेलमध्ये संघटनात्मक दौरा होणार असल्याची माहिती भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी मावळ लोकसभा मतदार संघ निवडणुक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवारी (दि. ९) आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

शहरातील मार्केट यार्ड येथे झालेल्या या पत्रकार परिषदेस भाजपचे पनवेल तालुका मंडल अध्यक्ष अरुणशेठ भगत, उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, दीपक बेहेरे, ॲड. प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत, तालुका मंडल सरचिटणीस राजेंद्र पाटील, भूपेंद्र पाटील आदी उपस्थित होते.

अविनाश कोळी यांनी पुढे सांगितले की, भाजपच्या वतीने आगामी लोकसभा निवडणुकीकरिता संपूर्ण देशभरात **(पान २ वर..)**

> **भाजप इतरांपेक्षा वेगळा आणि जबाबदारीने काम करणारा पक्ष आहे. सतत कार्यक्रम आणि त्या अनुषंगाने लोकांमध्ये राहणारा पक्ष आहे. एनडीए जिंकली पाहिजे यासाठी आमचा प्रवास आहे. भाजपचे संघटन ताकदीने सर्व २८८ विधानसभा मतदारसंघात उभे आहे.**
>
> **-आमदार प्रशांत ठाकूर, मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख, भाजप**

निवडक

इस्त्रायल, गाझामधील भारतीय नागरिक सुरक्षित

जेरुसलेम : इस्त्रायलवर 'हमास'ने चढवलेल्या हल्ल्यानंतर अद्याप गाझा पट्टी आणि इस्त्रायलमधील भारतीय नागरिक सुरक्षित आहेत. सुमारे १८ हजार भारतीय नागरिक इस्त्रायलमध्ये राहतात. सुदैवाने आतापर्यंत त्यांच्याशी संबंधित कोणतीही अप्रिय घटना घडली नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

राष्ट्रवादीबाबत पुढील सुनावणी आता ९ नोव्हेंबरला होणार

नवी दिल्ली : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कुणाचा या मुद्द्यावर निवडणूक आयोगात सुरू असलेली सोमवार (दि. ९)ची सुनावणी संपली आहे. या पुढची सुनावणी ही ९ नोव्हेंबर रोजी होणार आहे. राष्ट्रवादीत आतापर्यंत लोकशाही मार्गाने काम होत नव्हते, शरद पवार आपले घर चालवल्याप्रमाणे पक्ष चालवतात असा दावा अजित पवार गटाकडून करण्यात आला.

पनवेल : न्हावे गावातील संदीप म्हात्रे, संदीप पाटील, दीपक भोईर, संदीप भोईर या युवा कार्यकर्त्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. या वेळी न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, माजी सरपंच चंद्रकांत भोईर, सदस्य सागर ठाकूर, भाजप न्हावा अध्यक्ष तुषार भोईर, म्हसेश्वर मंदिर कमिटीचे अध्यक्ष सी. एल. ठाकूर, महिला मंडळ प्रमुख मिनाक्षी पाटील, रंजना घरत, चंद्रकांत पाटील, रूपेश घरत, चंद्रकांत घरत, दीपक भोईर, विनोद पाटील आदी उपस्थित होते.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर आज दोन तासांचा विशेष ब्लॉक

लोणावळा, पुणे : प्रतिनिधी

आयटीएमएस प्रणालीच्या कामासाठी मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर मंगळवारी (दि. १०) पुन्हा विशेष ब्लॉक घेतला जाणार आहे. पुण्याकडे येणाऱ्या मार्गिकेवर दुपारी १२ ते २ असा हा दोन तासांचा हा ब्लॉक असणार आहे. अमृतांजन पुलाच्या किलोमीटर ४५ आणि ४५.८०० किलोमीटरवर ओव्हरहेड गॅन्ट्री बसवली जाणार असल्याने हा ब्लॉक घेतला जाणार आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांकडून देण्यात आली आहे.

या कामावेळी पुण्याकडे येणारी अवजड वाहतूक खालापूर टोल नाक्यावर थांबवली जाणार आहे तसेच हलकी वाहतूक जुन्या मुंबई-पुणे महामार्गाकडे वळविण्यात येणार आहे, मात्र मुंबईकडे जाणारी वाहतूक मात्र सुरळीत सुरू असणार आहे. याची नोंद घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. फक्त कारसाठी जुना मुंबई-पुणे महामार्ग शिंग्रोबा घाटातील सुरू राहील.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर दरडी हटविण्यासाठी ब्लॉक घेण्यात आला होता. अनेकदा हा ब्लॉक घेण्यात आला होता, मात्र तब्बल महिना ते दीड महिन्यांच्या कालावधीनंतर मंगळवारी पुन्हा १२ ते २ असा विशेष ब्लॉक घेण्यात येणार आहे. त्यात पुण्याकडे येणारी वाहतूक थांबवण्यात येणार आहे. त्यामुळे या मार्गाने प्रवास करणाऱ्या प्रवाशी नागरिकांनी यांची नोंद घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मुंबई-पुणे या रस्त्यावरून दिवसभरात लाखो वाहने ये-जा करत असतात. या मार्गावरून मुंबईला कमी वेळेत जात येत असल्याने सर्वजण. या मार्गाचा वापर केला जातो. त्यामुळे या मार्गाला विशेष महत्व आहे, मात्र उद्या विशेष ब्लॉक घेतला जाणार असल्याने तीन तासांसाठी पुण्याकडे येणारी वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांकडून देण्यात आली आहे.

दरम्यान, ३१ ऑगस्टलादेखील महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून अशाच प्रकारचा ब्लॉक घेण्यात आला होता. त्यावेळी देखील पुण्याकडे जाणारी वाहतूक बंद करण्यात आली होती.

राज्यातील तापमानात वाढ

नागपूर : प्रतिनिधी

देशाच्या उत्तरेकडील राज्यांमधून मान्सूनच्या परतीचा प्रवास सुरू झाला असताना आता महाराष्ट्रातूनदेखील मान्सून माघारी परतण्यास सुरुवात झाली आहे.

नागरिकांना ऑक्टोबर हीटचा येतोय अनुभव

दरम्यान, मागील काही दिवसांपासून राज्यात तापमानात वाढ सुरू झाली आहे. येत्या काही दिवसात मान्सून राज्यातून पूर्णपणे माघार घेईल. यादरम्यान राज्याच्या काही भागात पावसाच्या तुरळक सरी वगळता हवामान कोरडे राहील, असा अंदाज आहे.

माघारी फिरतांनाही राज्यात अनेक जिल्ह्यात पावसाने जोरदार हजेरी लावली. विशेषत: कोकण, गोवा आणि मुंबईत पावसाने धुमाकूळ घातला. पुण्याच्या घाट परिसरातदेखील चांगला पाऊस झाला. गेल्या काही दिवसांपासून विदर्भासह राज्यातील काही भागात तापमान वाढीला सुरुवात झाली आहे. वातावरणाच्या उष्णतामानात वाढ होत आहे. दिवसा तापमान वाढलेले तर रात्री तापमानात मोठी घट होतांना दिसत आहे. पहाटे थंड वाऱ्याची झुळूक आणि दिवसा मात्र उन्हाच्या झळा तीव्र होताना दिसत आहे.

°C
50
40
30
20
10
0
-10
-20
°F
120
110
100
90
80
70
60
50
40
30
20

नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी आधीच देशाच्या ४५ टक्के क्षेत्रातून माघारी फिरला आहे तर उर्वरित देशातून देखील मॉन्सून माघारी फिरण्याच्या तयारीत आहे. साधारणत: येत्या दोन दिवसांत देशातील एकूण ८५ ते ९० टक्के भागांतून मान्सून माघारी फिरणार आहे. असे असले तरी मान्सून फक्त रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि गोव्यात आणखी ३ ते ४ दिवस राहील. ११ ऑक्टोबरच्या आसपास संपूर्ण राज्यातून माघार घेण्याची शक्यता आहे.

पुढील पाच दिवस झळा तीव्र

गेल्या आठवड्यात पाऊस तर आता उन्हाचा चटका वाढू लागण्याने नागरिक ऑक्टोबर हिटचा अनुभव घेत आहे. राज्यात पूढील पाच दिवस तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

भारत-पाक सामन्यासाठी यंत्रणा सतर्क

नवी दिल्ली : भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना १४ ऑक्टोबर रोजी नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणार आहे. दोन दिवसांपूर्वी अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियम उडवून देण्याची धमकी ईमेलद्वारे मिळाली होती. यानंतर केंद्रीय यंत्रणा सतर्क आहेत. या सामन्यासाठी अहमदाबाद पोलिसांकडून सात हजार पोलीस तैनात केले जातील. याशिवाय चार हजार होमगार्ड्सचा फौजफाटा तैनात करण्यात येणार आहे. मलिक यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले की, सामन्याच्या सुरक्षेसाठी तीन एनएसजी टीम आणि एक ड्रोन विरोधी टीमदेखील असेल. बॉम्ब डिस्पोजेबल स्क्वॉड सोबत एनडीआरएफ आणि एसडीआरएफ टीमदेखील तैनात असेल.

जनसहभागातूनच आयुष मिशन यशस्वी होईल

केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल यांचे क्षेत्रीय आढावा बैठकीत प्रतिपादन

मुंबई : प्रतिनिधी

राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाच्या सहकार्याने केंद्रीय आयुष मंत्रालयाच्या अंतर्गत राष्ट्रीय आयुष मिशनच्या क्षेत्रीय आढावा बैठकीचे आयोजन सहारा स्टार हॉटेल येथे करण्यात आले होते. जनसहभागातूनच आयुष मिशन यशस्वी होईल, असे प्रतिपादन केंद्रीय आयुष, बंदरे, जहाज बांधणी व जल वाहतूक मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी या बैठकीत केले.

सध्या भारत जगातील पाचवी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली सन २०३० पर्यंत देशाला जगातील तिसरी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था बनविण्याचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी देशाला सर्वच क्षेत्रांमध्ये आत्मनिर्भर व्हावे लागणार आहे. भारताला विकसित राष्ट्र घडविण्यासाठी 'आयुष' क्षेत्रामध्ये मोठी संधी आहे. त्यात या क्षेत्राचा सहभाग महत्त्वाचा असणार आहे, असेही प्रतिपादन केंद्रीय मंत्री श्री. सोनोवाल यांनी केले.

REGIONAL REVIEW MEETING
NATIONAL AYUSH MISSION

या वेळी केंद्रीय आयुष, महिला व बालविकास राज्यमंत्री डॉ. मुंजपारा महेंद्रभाई कालूभाई, केंद्रीय आयुष मंत्रालयाचे सचिव पद्मश्री राजेश कोटेचा, अतिरिक्त सचिव तथा आयुष विभागाचे आर्थिक सल्लागार जयदीपकुमार मिश्रा, केंद्रीय सहसचिव कविता गर्ग, राज्याच्या आरोग्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, वैद्यकीय शिक्षण विभागाचे आयुक्त राजीव निवतकर उपस्थित होते. तसेच महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, गोवा, या राज्यांचे आणि दादरा व नगर हवेली, दीव दमण, अंदमान व निकोबार या केंद्रशासित प्रदेशांचे आयुष व आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मानवी शरीराला विविध आजारांपासून संरक्षण देण्याचे महत्त्वाचे काम आयुष मिशन करणार आहे. आयुष मधील जनतेचा सहभाग वाढविणे गरजेचे आहे, असे श्री. सोनोवाल म्हणाले.

आयुष विभागाचे केंद्रीय सचिव पद्मश्री राजेश कोटेचा यांनी प्रास्ताविकात आयुष विभागाची ही चौथी आढावा बैठक असल्याचे सांगत सध्या देशात २५ हजार आयुष चिकित्सक काम करत असल्याची माहिती दिली. देशात १४७ आयुष हॉस्पिटल असून आठ कोटी ४२ लाख रुग्णांनी 'हेल्थ ॲण्ड वेलनेस सेंटर'मधून लाभ घेल्याची माहितीही त्यांनी दिली.

विविध आधुनिक कौशल्य अभ्यासक्रम राबवावे

राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कामकाजाचा राज्यपालांकडून आढावा

मुंबई : प्रतिनिधी

केंद्र व राज्यशासन कौशल्य विकासाला सर्वाधिक चालना देत आहेत. आजकाल सर्वसाधारण पदवीपेक्षा कौशल्य विकासातील पदवीला महत्व आले आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास विद्यापीठाने राज्यात विद्यार्थ्यांसाठी विविध आधुनिक कौशल्य अभ्यासक्रम राबवावे, अशी सूचना राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांनी सोमवारी (दि. ९) येथे केली.

राज्यपाल बैस यांनी सोमवारी महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कामकाजाचा राजभवन येथे आढावा घेतला, त्या वेळी ते बोलत होते.

पनवेल येथे आयटीआयच्या जागेवर विद्यापीठाची इमारत तसेच आयटीआयची नवी वास्तू उभारण्याच्या कामाचे मार्च महिन्यात भूमिपूजन झाले असून पुढील वर्षी जूनपर्यंत विद्यापीठाच्या इमारतीचे पहिल्या टप्प्याचे बांधकाम पूर्ण होणे अपेक्षित आहे, असे कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ. अपूर्वा पालकर यांनी या वेळी सांगितले.

कौशल्य विकास अभ्यासक्रमांची आवश्यकता लक्षात घेऊन विद्यापीठाने खारघर येथे एक इमारत भाड्याने घेऊन यावर्षीपासूनच कौशल्य विकासाचे १५ पदव्युत्तर, पदवी व प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविण्यास सुरुवात केली आहे अशी माहिती त्यांनी दिली. यासाठी विद्यापीठाने अनुभवी प्राध्यापकदेखील नेमले असल्याचे त्यांनी सांगितले. पुणे येथे देखील यावर्षीपासून कौशल्य विकास अभ्यासक्रम सुरू करीत असल्याचे त्यांनी राज्यपालांना सांगितले.

विद्यापीठाने तयार केलेल्या अभ्यासक्रमांमध्ये कम्प्युटर टेक्नॉलॉजी, इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी, बॅचलर ऑफ व्होकेशनल ट्रेनिंग, बॅचलर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन (रिटेल), आदरातिथ्य, डिजिटल मार्केटिंग, बिझनेस अनॅलिटीक्स आदी अभ्यासक्रमांचा समावेश आहे अशी माहिती त्यांनी दिली. विद्यापीठाने आपले अभ्यासक्रम राबविण्यासाठी विविध नामवंत कंपन्यांशी सहकार्य करार केले असल्याचे त्यांनी सांगितले.

सेक्स रॅकेट उद्ध्वस्त; सात बांगलादेशी महिलांची सुटका

सहा आरोपी गजाआड

पनवेल : रामप्रहर वृत्त

तालुक्यातील हेदुटणे गावात सुरू असलेल्या सेक्स रॅकेटचा पर्दाफाश करीत मानपाडा पोलिसांनी सात बांगलादेशी महिलांची सुटका केली आहे. त्याचप्रमाणे एकूण सहा आरोंपीना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

बांगलादेशातील एनजीओच्या अधिकारी मुक्ता दास यांनी फिडम फर्म या पुण्यातील सामाजिक संस्थेस ई मेलद्वारे कळविले की, राणा नांवाच्या इसमाने एका १९ वर्षीय बांगलादेशी महिलेस नोकरीला लावण्याच्या बहाण्याने बांगलादेशामधून भारतामध्ये आणून हेदुटणे नावाच्या गावामध्ये तिला खोलीत डांबून ठेवुन तिच्यावर वारंवार लैगिंक अत्याचार केले आहेत. यानंतर शुक्रवारी (दि. ६) तिची सुटका करण्यासाठी फिडम फर्म संस्थेतील समाजसेविका शिल्पा वानखेडे यांनी मानपाडा पोलीस ठाण्याला संपर्क साधून मदतीची मागणी केली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक शेखर बागडे यांनी त्वरीत पथकाला हेदुटणे गावामध्ये रवाना केले. मानपाडा पोलीस पथकाने हेदुटणे गावातील विठ्ठल रूक्मिणी मंदिराजवळ असलेल्या घरामध्ये रात्री १२ वा. सुमारास छापा टाकला असता, घराच्या तळमजल्यावर सहा पीडित बांगलादेशी महिला असल्याचे दिसले. पोलिसांनी विचारपूस केली असता युनुस शेख उर्फ राणा याने त्याच्या साथीदारांच्या मदतीने या सर्व महिलांना नोकरीचे व उपचाराचे अमिष दाखवून बांगलादेशातून भारत देशामध्ये आणून डांबुन ठेवल्याचे समजले. या महिलांना जबरदस्तीने देहव्यापार करण्यास लावून त्याबदल्यात राणा व त्याचे साथीदार लोकांकडून पैसे घेत असल्याचे महिलांनी पोलिसांना सांगितले. राणा व त्याचे साथीदार पलावा सिटीमध्ये असल्याचे पीडित महिलांनी सांगितल्यानंतर पोलिसांनी पलावा सिटीमध्ये सर्च ऑपरेशन सुरू केले. आरोपींना पोलिसांचा सुगावा लागल्याने ते अंधाराचा फायदा घेऊन गावाबाहेर पळून गेले.

मानपाडा पोलिसांनी आणखी मनुष्यबळ मागवून पाच आरोपींना पकडले. या आरोपींमध्ये युनूस अखमल शेख उर्फ राणा (वय ४०), साहिल मिजापुर शेख (वय २६), फिरदोस नुर हुसेन सरदार (वय २४), आयुबअली अजगरअली शेख (वय ३५), बिपलॉप हापीजूर खान (वय २४) यांचा समावेश आहे. यातील मुख्य आरोपी युनुस शेख उर्फ राणा याच्या सांगण्यावरून स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी बांगलादेशी आरोपींना घर उपलब्ध करून देणारा योगेश बळीराम काळण (वय ३१) यालाही पोलीस पथकाने ताब्यात घेतले. त्यानंतर शिल्पा वानखेडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करून एकूण सहा आरोपींना अटक केली आहे.

तपासादरम्यान पोलिसांना आरोपीच्या खोलीमध्ये २५ संशयित आधार कार्ड, १० पॅनकार्ड, चार जन्मतारखेचे दाखले तसेच बांगलादेश व भारताच्या चलनी नोटा सापडल्या आहेत. मानपाडा पोलिसांकडून घरमालकांना भाडेतत्वावर घर देताना भाडेकरूंची नीट पडताळणी केल्याशिवाय घर भाड्याने देऊ नये तसेच भाडेकरू ज्या ठिकाणी नोकरी किंवा मजुरी करतो त्याठिकाणी जाऊन त्याची खात्री करावी, भाडेकरूच्या हालचालीबाबत संशय आल्यास ताबडतोब पोलीसांना कळवावे, असे आवाहन केले आहे.

मच्छिमारांना साडेपाच कोटींची नुकसान भरपाई अदा

आमदार मंदा म्हात्रे यांच्या पाठपुराव्याला यश

नवी मुंबई : बातमीदार

एमएमआरडीएतर्फे उभारण्यात येत असलेल्या बहुचर्चित न्हावाशेवा- शिवडी सी-लिंक प्रकल्पामुळे बाधित झालेल्या नवी मुंबईतील दिवाळे, बेलापूर, सारसोळे, वाशी, ऐरोली येथील मच्छीमार बांधवांना बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे मच्छिमार बांधवांना नुकसान भरपाईची एक रकमी रक्कम रु. पाच कोटी ५६ लाख थेट मच्छीमार बांधवांचा बँक खात्यात जमा झाली आहे. त्यानिमित्ताने सीबीडी येथील वारकरी भवन येथे आमदार मंदा म्हात्रे यांच्या सत्कार कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या वेळी कोळी महासंघ अध्यक्ष तथा विधान परिषद आमदार रमेश पाटील उपस्थित होते.

ज्या मच्छीमार बांधवांची कागदपत्रांअभावी प्रक्रिया अपूर्ण आहे ती लवकरात लवकर कागदपत्रांची पडताळणी करून उर्वरित मच्छीमार बांधवांना नुकसान भरपाई मिळवून देणार असल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले.

या वेळी खांदेवाले मच्छीमार संस्था, फगेवाले मच्छीमार संस्था, डोलकर मच्छीमार संस्था, एकविरा मच्छीमार विक्रेता संघ, सारसोळे ग्रामस्थ मंडळ व ऐरोली ग्रामस्थ यांच्या वतीने आमदार मंदा म्हात्रे यांना पुष्पहार घालून सत्कार केला. कार्यक्रमात माजी जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत, डॉ. राजेश पाटील, राजेश राय, माजी नगरसेवक निलेश पाटील, माजी नगरसेवक दिपक पवार, माजी नगरसेवक सुनील पाटील, माजी नगरसेवक भरत जाधव, माजी नगरसेवक अशोक गुरुखे, विजय घाटे, दत्ता घंगाळे, पांडुरंग आमले, जगनाथ जगताप, मुकुंद विश्वासराव, गोपाळराव गायकवाड उपस्थित होते.

> **तत्कालीन एमएमआरडीएचे चेअरमन तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या सहकार्याने व घेतलेल्या निर्णयामुळे न्हावाशेवा-शिवडी सी-लिंक प्रकल्पबाधित मच्छीमार बांधवाना दिवाळी भेट मिळाली आहे. कोळी बांधव मासेमारी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात म्हणून माझ्या मच्छीमार कोळी बांधवांना संकटातून बाहेर काढणे हे माझे प्रथम कर्तव्य आहे.**
>
> **-आमदार मंदा म्हात्रे, बेलापूर विधानसभा क्षेत्र**

आदिवासींकडून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर

अलिबाग : प्रतिनिधी

धनगर समाजाला अनुसुचित जमाती प्रवर्गात आरक्षण देऊ नये या प्रमुख मागणीसाठी आदिवासी समाजाने सोमवारी (दि. ९) रायगड जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून आदिवासी अधिकार संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले.

राज्य सरकारने धनगर समाजाला आदिवासींच्या अनुसूचित जमाती प्रवर्गात समाविष्ट करून घेऊ नये. आदिवासी समाजाचे आरक्षण अबाधित रहावे, रायगड जिल्ह्यातील दळी जमिनींचा प्रश्न सोडवून, त्याचे सातबारे दळी धारकांच्या नावे करण्यात यावेत. पैसा कायद्याची अंमलबजावणी करावी आदी मागण्या या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत. दरम्यान, कर्जत तालुक्यातही संघर्ष आदिवासी सामाजिक संघटनेने सर्व शासकीय अधिकाऱ्यांना निवेदन दिले.

डॉ. चिंतामणराव देशमुख शहर सभागृहाचे काम प्रगतीपथावर

आमदार अनिकेत तटकरे यांनी केली पाहणी

रोहे : प्रतिनिधी

रोहा अष्टमी नगर परिषदेच्या वतीने बांधण्यात येत असलेल्या शहरातील डॉ. चिंतामणराव देशमुख शहर सभागृहाचे काम प्रगतीपथावर असून या कामाची पाहणी सोमवारी (दि. ९) आमदार अनिकेत तटकरे यांनी केली आहे. त्यांच्यासमवेत मुख्याधिकारी पंकज भुसे, माजी नगरसेवक महेश कोलटकर, महेंद्र गुजर, अहमद दर्जी, समिर सकपाळ, सुभाष राजे, मजीद पठाण, रवी चाळके, सागर बोबड, रुपेश पाटील, नगर परिषदेचे ओंकार भुरण, अभियंता सुधीर भगत उपस्थित होते.

शहरात अत्याधुनिक पद्धतीचे तंत्रज्ञान वापरून डॉ. चिंतामणराव देशमुख शहर सभागृह बांधण्यात येत आहे. नाट्यगृहासह प्रदर्शनासाठी जागा, वाचनालय यासह विविध सुविधा युक्त हे सभागृह असणार आहे. सध्या सरासरी २० टक्के काम झाले आहे.सभागृहासाठी २३ कोटी अपेक्षित खर्च असून ३१ मार्च २०२४ पर्यंत काम पूर्ण होणार आहे. या शहर सभागृहात ९४९ क्षमतेची आसन व्यवस्था असणार आहे. कलाकारांसाठी विश्रामगृह असुन यासह मेकअप (ग्रीन हाऊस) रुम असणार आहे. आत्याधुनिक पद्धतीने बांधण्यात येत असलेल्या या शहर सभागृहात आपत्काली (फायर एक्झिट) बाहेर पडण्यासाठी व्यवस्था करण्यात आली आहे.

कलाकार व प्रेक्षकांसाठी अल्पोपहाराची व्यवस्थाही शहर सभागृहात असणार आहे. अनेक सुविधा युक्त बांधण्यात येत असलेल्या सभागृहात स्पर्धा परीक्षा तयारी करणाऱ्या तरुणांची व्यवस्था या ठिकाणी करण्यात येणार असून यासाठी वाचनालय या ठिकाणी करण्यात येणार आहे.महत्वाचे याठिकाणी अतिथीगृह असणार आहे. दुसरीकडे प्रोजेक्ट रुम या शहर सभागृहात असणार आहे.

खारफुटीची कत्तल करणाऱ्यांवर करवाई करा

कुरुळच्या महिलांची तहसीलदारांकडे मागणी

अलिबाग : प्रतिनिधी

कुरुळ खाडीत खारफुटीची कत्तल करणाऱ्यांवर कारवाई करा, अशी मागणी कुरुळ गावातील महिलांनी अषलबागच्या तहसीलदारांकडे निवेदनातून केली. कुरुळ येथील महिलांनी सोमवारी (दि. ९) एकत्र येत कोकण बार्ज कंपनी विरोधात अलिबाग तहसीलदार विक्रम पाटील यांना निवेदन दिले, तसेच आमदार महेंद्र दळवी यांची भेट घेऊन आपल्या व्यथा मांडल्या.

या वेळी कुरुळ गावच्या सरपंच ॲड. सुलभा पाटील, सदस्य भुषण बिर्जे, अवधूत पाटील, आकाश घाडगे, ॲड. योगेश घाडगे, अभिजीत घाडगे, वंदना घाडगे, रंजना पाटील, आलका म्हात्रे, सुजाता कार्लेकर, नलीनी पाटील आदी उपस्थित होते.

कोकण बार्ज कंपनीमध्ये मोठी जहाजे बनतात सध्या कंपनी खाडीच्या क्षमतेपेक्षा मोठी जहाजे खाडीतून येत आहेत. कंपनीने ग्रामस्थांना विश्वासास न घेता अवैधरित्या खाडीमध्ये खारफुटीची ची मोठी प्रमाणात तोड करीत कुरुळ खाडीतील सुमारे १५०० ब्रास वाळू मिश्रीत रेतीचे उत्खनन केल्याचे ग्रामस्थांना दिसले. या वाळूमिश्रीत रेतीमध्येच तिसऱ्या व कालवे यांचे नैसर्गिक रित्या उत्पादन होते. जर असेच अवैध रित्या उत्खनन चालू राहिले तर कुरुळ गावातील व परिसरातील सुमारे २००हून अधिक कुटुंबावर उपासमारीची वेळ येईल, असे या निवेदनात म्हटले आहे.

गुरांची अवैध वाहतूक करणारे टेम्पो पकडले

नागोठणे पोलिसांची कामगिरी

नागोठणे : प्रतिनिधी

मुंबई-गोवा महामार्गावरून महाड बाजूकडून मुंबईच्या दिशेने जनावरांची अवैध वाहतूक केली जात असल्याची खबर नागोठणे पोलिसांना समजताच वाकण फाटा येथे सापळा रचून जनावरांनी भरलेले आयशर टेम्पो पकडून जनावरांची सुटका केली आहे.

या बाबत सविस्तर वृत्त असे की, ७ ऑक्टोबर रोजी १२ वाजताच्या दरम्यान मिळालेल्या माहिती नुसार मुंबई-गोवा महामार्गावरून महाड कडून मुंबई कडे जाणाऱ्या आयशर टेम्पो एमएच ०३ डीव्ही ८०२१ मौजे वाकण फाटा येथे आला असता त्यामध्ये दोन लाख रुपये किमतीच्या दहा म्हशी अंदाजे वय आठ ते दहा वर्ष कोणताही चारा अगर पाण्याची व्यवस्था न करता निर्दयापने वाहतूक करीत असल्याचे निर्दर्शनास आले.

या बाबत जनावरांची अवैध वाहतूक करणाऱ्या टेम्पोचालक व अन्य एकास नागोठणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून नागोठणे पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप पोमण यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास पोलीस हवालदार एम. व्ही. लांगी करत आहेत.

पान १ वरुन

तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी ५३१ कोटींची मान्यता

याचबरोबर बांधकामासाठी १६ कोटींची वाढीव निधी यानुसार १६३ कोटी रुपयांच्या सुधारित आराखड्यास मान्यता देण्यात आली. याबैठकीत श्री सप्तशृंगी देवी विकास आराखड्याबाबत चर्चा झाली. नाशिक जिल्हाधिकाऱ्यांनी या तीर्थक्षेत्र विकासासाठी ८१.८६ कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर केला आहे. हा सुधारित आराखडा २५ कोटींपेक्षा अधिक असल्याने तो ग्रामविकास विभागाकडून नियोजन विभागाकडे हस्तांतरीत करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. सुधारीत आराखड्यात स्वच्छतागृह बांधणे, डोम बसविणे, दरड कोसळण्यापासून संरक्षणात्मक जाळी बसविणे आदी विविध कामांचा समावेश आहे. याठिकाणी दोन दिवसांपूर्वीच भेट दिल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या वेळी सांगितले.

भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उद्या पनवेलमध्ये

महाविजय २०२४ अंतर्गत लोकसभा मतदार संघाची बांधणी सुरू आहे. आगामी निवडणुकीसाठी भाजपने राष्ट्रीय पातळीवर ४०० प्लस तर महाराष्ट्र राज्यात ४५ पेक्षा जास्त जागांवर विजय मिळवण्याचे उद्दिष्ट केले आहे. त्या अनुषंगाने भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा महाराष्ट्रातील सर्व लोकसभा मतदार संघात प्रवास सुरू आहे. त्यातील एक भाग असलेल्या ३३ मावळ लोकसभा मतदार संघात बुधवारी त्यांचा दौरा होणार असून त्यांच्या या दौऱ्याच्या अनुषंगाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

पक्षाची माहिती, ध्येय धोरणे बुथ मधील शेवटच्या नागरिकापर्यंत माहिती व्हावी, याकरिता एका प्रमुख पदाधिकाऱ्याकडे विधानसभा मतदार संघातील तीन ते चार बुथची संपूर्ण जबाबदारी सोपवण्यात आली असून पक्षाने त्यांना 'विधानसभा वॉरियर्स' म्हणून संबोधले आहे. सकाळी १० वाजता अभिवादन चंद्रशेखर बावनकुळे पनवेल शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करणार आहेत.

देशाच्या प्रगतीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निर्णय घेतले, लोकहिताच्या विविध योजना अंमलात आणल्या त्याची माहिती देण्यासाठी 'घर घर चलो संपर्क अभियान' सुरू आहे. त्या अनुषंगाने रायगड जिल्ह्यातील मावळ मतदार संघातील पनवेल, उरण, कर्जत या तीनही विधानसभा मतदार संघातील ही बैठक झाल्यानंतर पनवेल शहरात 'घर घर चलो' अभियान व 'मेरी माटी मेरा देश' अभियान राबविण्यात येणार आहे. या घर घर चलो संपर्क अभियानात प्रदेशाध्यक्षांसोबत तीनही विधानसभेतील हजारो कार्यकर्ते त्यांच्याबरोबर सहभागी होणार आहेत. त्यानंतर ते पनवेलमधील काही परिवाराच्या भेटी घेणार असून त्यानंतर होणाऱ्या कॉर्नर बैठकीत ते कार्यकर्ते आणि नागरिकांशी संवाद साधणार आहेत.

मावळ लोकसभा मतदार संघातील विधानसभा वॉरियर्सची बैठक स्वतः प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात घेणार आहेत. निवडणुकीत मतदान होईपर्यंत तो बुथ अधिकाधिक मजबूत करण्यासाठी म्हणजेच त्या बुथवर ५१ टक्के चे गणित करण्यासाठी घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमांसंदर्भात या बैठकीत श्री. बावनकुळे 'विधानसभा वॉरियर्स' सूचना देणार आहेत. प्रदेशाध्यक्षांच्या या संघटनात्मक दौऱ्याची पनवेलमध्ये तयारी जल्लोषात सुरू असल्याचेही अविनाश कोळी यांनी सांगितले.

कमळ पतसंस्थेच्या कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण

अलिबाग : प्रतिनिधी

रायगड जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील लौकिकप्राप्त अशा कमळ नागरी सहकारी पतसंस्थेमध्ये नव्याने नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांसाठी एकमहिन्याचा प्रशिक्षण वर्ग सुरू केला आहे. त्याचे उद्घाटन गुरुवारी (दि.५) करण्यात आले.

प्रशिक्षित कर्मचारी ही काळाची आणि संस्थेची गरज असून कमळ पतसंस्थेने आपला लौकिक तसेच विश्वासार्हता वाढविण्यासाठी योग्य पाऊल उचलल्याबद्दल जिल्ह्याचे सहकारखात्याचे उपनिबंधक प्रमोद जगताप यांनी संस्थेचे कौतुक केले.

उद्घाटनावेळी तालुका सहाय्यक निबंधक श्रीकांत पाटील, कमळ पतसंस्थेचे चेअरमन सतीश पाटील, ज्येष्ठसंचालक गिरीश तुळपुळे, कमळ पतसंस्थेचे उपाध्यक्ष नंदकुमार चाळके, सचिव गितांजली ओक तसेच प्रशिक्षण कार्यक्रमाच्या समन्वयक ऋतुजा बेलोस्कर व कर्मचारी उपस्थित होते.

कर्मचारी प्रशिक्षण कार्यक्र
०५ ऑक्टोबर ते ०४ नोव्हेंबर २०२३
Workshop
Development
Learn
TRAINING
Teaching
Knowled

आमदार प्रशांत ठाकूर यांनी जाणले पनवेल मालधक्का रहिवाशांचे प्रश्न

रेल्वेच्या सुरक्षा भिंत बांधकामाची पाहणी

पनवेल : रामप्रहर वृत्त

मालधक्का परिसरात राहणाऱ्या रहिवाशांचे पुनर्वसन होत नाही तोपर्यंत त्यांच्या उदर्निवाहाचे साधन बंद होऊ नये तसेच रेल्वे प्रशासनाचे काम सुरू असताना होणताही अडथळा निर्माण होणार नाही यासाठी समन्वय साधण्याचे काम करणार असल्याचे आश्वासन आमदार प्रशांत ठाकूर यांनी सुरक्षा भिंत बांधण्याच्या कामाचा आढावा घेताना दिले.

पनवेलमध्ये राहणाऱ्या नागरिकांची रेल्वे वाहतूक अधिक सुलभ तसेच सुखकर करण्यासाठी भारतीय रेल्वेच्या माध्यमातून विविध प्रकल्पांवर काम सुरू आहे. याचाच एक भाग म्हणून पनवेल रेल्वे स्टेशन प्लॅटफॉर्म क्रमांक ३च्या बाजूला सुरक्षा भिंत बांधण्यात येणार आहे. या कामांचा आढावा भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी सोमवारी अधिकाऱ्यांसह घेत कामांची पाहणी केली. या भेटीदरम्यान रेल्वे प्रवाशांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि त्यावर तोडगा काढण्याचे आश्वासन दिले.

रेल्वे प्रशासनाच्या या सुरक्षा भिंतीच्या कामामुळे मालधक्का परीसरातील रहिवाशांचे माजी नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार, भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या पाठपुराव्यामुळे पुनर्वसन पनवेल महापालिकेच्या माध्यमातून केले जाणार आहे. त्या पार्श्वभूमीवर आमदार प्रशांत ठाकूर हा पाहणी दौरा केला. या वेळी ते म्हणाले की, मालधक्का परिसरामध्ये राहणाऱ्या रहिवाशांचे भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या पाठपुराव्यामुळे पुनर्वसन महापालिकेच्या माध्यमातून होणार आहे. हे लवकरात लवकर व्हावे तसेच पुनर्वसन होण्याच्या कालावधीत रहिवाशांचे उदरनिर्वाहाचे साधन बंद होऊ नये तसेच रेल्वेला काम करताना कोणताही अडथळा होऊ नये यासाठी समन्वय साधण्याचा प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन दिले.

या वेळी माजी उपमहापौर चारूशीला घरत, माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार, माजी नगरसेविका सुशीला घरत, ॲड. वृशाली वाघमारे, जितेंद्र वाघमारे, भाजप झोपडपट्टी सेल उत्तर रायगड जिल्हा संयोजक राहुल वाहुळकर, अनुसूचित जाती मोर्चा पनवेल तालुका उपाध्यक्ष रावसाहेब खरात, अशोक आंबेकर, संजय जाधव, पप्पू साळवे, राजू बगाते, नंदा टापरे, ज्योती गुप्ता, शैला आंबेकर, झरीना शेख, पोपट मुंगसे, दीपक वाहुळकर, किशोर वाहुळकर, गोरख खवले, आनंद जाधव, विजय झिरे यांच्यासह रहिवासी उपस्थित होते.

खोपटे गावात रोजगार मेळावा

केंद्रिय मंत्री कपिल पाटील यांच्या हस्ते उद्घाटन

उरण : वार्ताहर

उरण तालुक्यातील खोपटे गावात पहिल्या भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन रविवारी (दि. ८) खोपटे गावातील भाजपचे युवा कार्यकर्ते गोरख ठाकूर यांच्या वतीने तसेच एकलव्य फाउंडेशन आणि भाजप खोपटे यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आले होते. ३४ महत्त्वाच्या कंपन्या व हजारो बेरोजगार यांचा सहभाग असलेल्या या मेळाव्याचे उद्घाटन केंद्रीय पंचायत राजमंत्री कपिल पाटील यांच्या हस्ते झाले.

उरण तालुक्यातील खोपटे गावात असलेला भाजप कार्यकर्ता गोरख ठाकूर आणि मित्र परिवार आणि चांगले काम केले आहे. खोपटे भाजपने छोट्याशा खेडेगावात प्रथमच खोप्ते गावात रोजगार मेळ्याव्याचे आयोजन करून तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध केली आहे. खेड्यामध्ये रोजगार निर्मिती व लोकांना रोजगार देणे ही पंतप्रधान नरेंद्र मोदींची संकल्यना आहे तसेच काहीसे उद्दीष्ट युनायटेड नेशनने ठेवले आहे ते पूर्ण करण्यासाठी गोरख ठाकूर व मित्र परिवार सहकार्य करीत आहेत, असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांनी खोपटे गावात रोजगार मेळाव्याचे उद्घाटनावेळी केले.

या उद्घाटनावेळी राष्ट्रीय किर्तनकार व महाराष्ट्रातील राज्यातील सुप्रसिद्ध सिए एकनाथ पाटील पनवेल महापालिका माजी उपमहापौर चारूलता घरत, भाजप उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर, उरणच्या माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, खोपटे सरपंच विशाखा ठाकूर, भाजप उरण तालुका चिटणीस सुनिल पाटील, तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड, उरण पूर्व विभाग अध्यक्ष शशी पाटील, खोपटे गाव अध्यक्ष नवनाथ ठाकूर, उपाध्यक्ष उत्कर्ष ठाकूर, युवा अध्यक्ष सुरज म्हात्रे व भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

> “
> उरण तालुक्यात पहिला भव्य रोजगार मेळावा आयोजित करण्याचे भाग्य आम्हाला मिळाले हेच खूप मोठे आहे. आपल्या तरुणांना रोजगार मिळवून देणे हे पुण्याचे काम आहे. या मेळाव्यासाठी आम्ही मेहनत जरी घेतली असली तरी याचे श्रेय हे कपिल पाटील साहेब व उरणचे आमदार महेश बालदी साहेब यांना जाते. त्यांची साथ आणी आशिर्वाद मोलाचे आहेत. आमदार महेश बालदी हे आम्हाला नेहनीच मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन करीत आहेत
>
> **–गोरख ठाकूर, आयोजक, खोपटे**

३४ कंपन्यांचा सहभाग

तालुक्यातील या पहिल्याच भव्य रोजगार मेळाव्याला खोपटे येथे हजारो बेरोजगार आपले स्वप्न घेऊन हजर झाले होते, तर या बेरोजगारांना नोकरीत सामावून घेण्यासाठी ३४ कंपन्यांनी सहभाग घेतला होता. या वेळी गोरख ठाकूर यांनी प्रास्तावीक करताना, उपस्थीत सर्व बेरोजगारांना त्यांच्या पात्रतेनुसार नोकरी देण्याचे सांगितले. या वेळी सर्वांना जाग्यावर नियुक्तीपत्र देण्यात आल्याने समाधान व्यक्त होत आहे.

द्रोणागिरीच्या भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयाची राज्यात प्रभावी कामगिरी

JANARDAN BHAGAT SHIKSHAN PRASARAK SANSTHA'S
SMT. BHAGUBAI CHANGU THAKUR VIDYALAYA, DRONAGIRI, URAN
(ENGLISH MEDIUM)

उरण : वार्ताहर

पीएलसी स्वच्छता मॉनिटर प्रकल्पाचा पहिला टप्पा नुकताच झाला. यामध्ये राज्यातील सर्वोत्तम १००च्या यादीत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या उरण तालुक्यातील द्रोणागिरी येथील श्रीमती भागुबाई चांगु ठाकूर विद्यालयाचा समावेश आहे.

महाराष्ट्र कचऱ्याबाबत निष्काळजी मुक्त करण्याच्या शिक्षण विभागाच्या पीएलसी स्वच्छता मॉनिटर प्रकल्पाचा पहिला टप्पा नुकताच झाला. प्रकल्पाचा पहिला टप्पा म्हणजे शाळा आणि विद्यार्थ्यांना स्वच्छता मॉनिटर प्रकल्पात नेमके काय करायचे हे समजण्यासाठीचा महत्त्वपूर्ण टप्पा कारण या प्रकल्पात विद्यार्थी स्वच्छतेचे महत्त्व पटवून देणारे किंव्हा संदेश देणारे दूत नसून; कळत नकळत झालेली चूक निर्दर्शनास आणून ती सुधारायला सांगणारे कडक मॉनिटर आहेत. प्रकल्पाचा शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर आणि उद्योग मंत्री उदय सामंत यांने केला होता.

६४ हजार शाळांची सहभागाची नोंदणी झाली आणि विद्यार्थी वाटेल तिथे कचरा टाकणाऱ्यांना आणि बेफिकीर थुंकणाऱ्यांना जागच्या जागी थांबवून झालेली चूक दाखवून देत होते. विद्यार्थ्यांने गांधीगिरी करत इतरांने केलेली घाण साफ करणे अपेक्षित नसून, लेट्स चेन्ज फिल्ममधील सरदार पटेलबाजी करत घाण करणाऱ्यालाच साफ करायला विनंती करणे अपेक्षित आहे. स्वच्छता मॉनिटरगिरी म्हणजे सफाई करणे किंव्हा भाषणबाजी नसल्यामुळे मुलांना मजा येते. आणि त्यापुढे घटनेचे विवरण सांगतानाचे मजेशीर व्हीडिओ करून सोशल मीडियाला शेअर करणे त्यांच्या आवडीचे काम बनून जाते. पहिल्या टप्प्यात असे १५ लाखांहून अधिक व्हिडिओ शेअर झाले आहेत.

पीएलसी स्वच्छता मॉनिटरीमध्ये सर्वोत्तम १००च्या यादीत

शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांने प्रस्तावित केलेल्या संकल्पनेला गती मिळालेली आहे, आणि दुसऱ्या टप्प्यात विद्यार्थ्यांना स्वच्छता मॉनिटर गिरी करण्याची सवय होण्यावर लक्ष्य केंद्रित होणार आहे. ठिकठिकाणी चुकीला कोणी ना कोणी पॉईन्ट ऑऊट केले तर सगळेच जास्ती जागरूक राहतील, आणि महाराष्ट्र निष्काळजी मुक्त बनेल, अशी माहिती प्रकल्प संचालक रोहित आर्याने दिली आहे.

पहिल्या टप्यात राज्यातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या राज्यातील नोंदणीकृत ६४ हजार शाळांपैकी सर्वाधिक प्रभावी १०० शाळांचे कौतुक आणि सत्कार मुंबई येथे एका कार्यक्रमात केले जाणार आहे. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेची श्रीमती. भागुबाई चांगु ठाकूर विद्यालया द्रोणागिरी उरण राज्यातील सर्वोत्तम १००च्या यादीत समाविष्ट आहे. त्याचबरोबर निवडक विद्यार्थ्यांना महाराष्ट्र स्वच्छता मॉनिटर आयडेन्टिटी कार्डने गौरवण्यात येणार आहे.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हॉईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे, शाळेचे चेअरमन चंद्रकांत घरत आदींनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

शाळेच्या मुख्याध्यापिका अनुराधा काठे यांनी त्यांच्या सर्व विद्यार्थ्यांना स्वच्छता मॉनिटर बनवून जागो जागी बेफिकीर लोकांना थांबवण्यास प्रोत्साहित केले आणि शाळा समन्वयक अंकिता पाटील व सोफिया शेख आणि सर्व वर्ग शिक्षिका नियमित विद्यार्थ्यांसोबत चर्चा करून, त्यांचे अनुभव ऐकून त्यांना मार्गदर्शन देत होते.

पनवेल : भाजप नेते रमेश म्हात्रे यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी नगरसेवक दिलीप पाटील, विजय चिपळेकर, भाजप नेते प्रकाश पाटील, सुधाकर पाटील, शांताराम भगत आदी उपस्थित होते.
(छाया : विकास म्हात्रे)

पनवेल परिसरात तीन वेगवेगळ्या अपघातात दोन ठार; तिघे जखमी

पनवेल : वार्ताहर

पनवेल परिसरात झालेल्या तीन वेगवेगळ्या अपघातात दोन ठार तीन जखमी झाल्याची घटना घडली.

तालुक्यातील ठोंबरेवाडी स्टॉप जवळ जुने पुणे-मुंबई रोडवर महेश कदम (वय ४६, रा. चांभार्ली) हे त्यांच्या मालकीची चारचाकी गाडी घेऊन पनवेल बाजूकडे येत असताना ठोंबरेवाडी स्टॉपजवळ त्यांच्या गाडीसमोर अचानक गाय आल्याने तिला वाचविण्याकरिता गाडी उजव्या बाजूला घेतली असता त्यांचा गाडीवरील ताबा सुटून गाडीने दोन पलट्या घेऊन झालेल्या अपघातात ते गंभीररित्या जखमी झाले. त्यात त्यांचा मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

दुसऱ्या घटनेत सुशील डुकरे (वय २५, रा. पोयंजेवाडी) हे त्यांची स्कुटी घेऊन पळस्पे येथील डी मार्ट येथे कामावर जात असताना डेरवली गाव रेल्वे ब्रिज जवळ हेमकुंड ढाब्या समोर अचानक टँकरसमोर येऊन त्यांच्या डाव्या पायाला ठोकर दिल्याने झालेल्या अपघातात त्यांचा पाय फॅक्चर झाला. त्यांच्या दुचाकीचेही नुकसान झाले आहे. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

तिसऱ्या अपघातामध्ये कळंबोली स्टील मार्केटमध्ये विक्रम सिंह हे त्यांचा मित्र अनिल जैन व अजून एक साथीदार मोटारसायकल घेऊन कामावर परत येत असताना त्यांची गाडी टेलरला जाऊन धडकली. या अपघातात विक्रम सिंह हा गंभीररित्या जखमी होऊन मयत झाला आहे, तर अनिल जैन व अजून एक सहकारी जखमी झाले आहेत. या अपघाताची नोंद कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

समाधानकारक पावसामुळे उरणमध्ये भातपिकांच्या उत्पादनात होणार वाढ

उरण : रामप्रहर वृत्त

तालुक्यात यावर्षी समाधानकारक पाऊस झाला आहे. त्यामुळे भातपिक जोमाने वाढत असून भातपिकांच्या उत्पादनात वाढ होणार असल्याने शेतकरी सुखावला आहे.

सुरुवातीला जून आणि ऑगस्ट महिन्यात पेरणीच्या वेळी पावसाने हुलकावणी दिली होती. त्यामुळे भातपिके शेतकऱ्यांच्या हातची जाण्याची वेळ आली होती, मात्र त्यानंतर झालेल्या पावसामुळे पिकासाठी लाभदायक पाऊस झाला आहे. परिणामी भातशेतीने पुन्हा उभारी घेतली आहे.

उरण तालुक्यातील बहुतांश शेतकरी हे भाताचे पीक आप आपल्या शेत जमिनीत घेत आहेत. यावर्षी जून व जुलै महिना अर्धा कोरडा गेल्याने शेतकऱ्यांसमोर संकट उभे ठाकले होते, मात्र भातलागवडीनंतर सप्टेंबर महिन्यात पावसाच्या सरी या कोसळू लागल्याने भात पिक जोमाने वाढू लागले आहे.

ऑक्टोबर महिन्यातही पाऊस समाधानकारक पडत असल्याने भाताची कणसे डोलताना दिसत असल्याने शेतकरी सुखावला आहे.तसेच रानसई व पुनाडे धरणातील पाणीसाठ्यात वाढ होत असल्याने उरणकरांचे पाणी टंचाईच संकट दूर होणार आहे.

पारगावातील नागरी समस्यांचा पाठपुरावा करणार -खा. बारणे

पनवेल : वार्ताहर

पारगाव परिसरातील नागरी समस्यांबाबत अनेक तक्रारी ग्रामस्थांकडून येत असून या समस्या सोडवण्यासाठी लवकरच सिडकोसोबत बैठक लावणार असल्याचे आश्वासन खासदार श्रीरंग बारणे यांनी दिले आहे.

जय हनुमान सार्वजनिक मित्र मंडळ पारगाव व ग्रामस्थ मंडळ पारगाव आयोजित गौर गणेशोत्सवाला भेट देताना खा. श्रीरंग बारणे यांनी केलेल्या भाषणात या विभागातील समस्या सोडवण्यासाठी सातत्याने सिडकोकडे पाठपुरावा करत आहे व या पुढेसुद्धा करणार असल्याचे सांगितले.

या वेळी माजी सरपंच तथा सदस्य निशा रत्नाकर पाटील, तंटामुक्त अध्यक्ष सदाशिव पाटील, सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब नाईक, रत्नदीप पाटील, माजी उपसरपंच तथा सदस्य अंजली राहुल कांबळे, माजी उपसरपंच व विद्यमान सदस्य मनोज दळवी, राहुल कांबळे, कार्यकर्ते सुनील पाटील, प्रवीण पाटील, कवी तारेकर, विजय पाटील, भालचंद्र मोकल, माणिक पाटील आदी उपस्थित होते.

आवक घटल्याने लिंबाच्या दरात वाढ

पनवेल : रामप्रहर वृत्त

एपीएमसीमध्ये लिंबाची आवक कमी झाल्यामुळे लिंबाच्या दरात वाढ झालेली आहे. किरकोळीत तीन रुपयांना मिळणारे लिंबू आता पाच रुपयांना मिळत आहेत. घाऊक बाजारात लिंबाचे दर दुप्पटीने वाढल्याने किरकोळ बाजारात एक नग लिंबू पाच रुपये दराने विकले जात आहेत. पुढील कालावधीत दर आणखीन वधारण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

गेल्या काही दिवसांपासून वातावरण बदल होत आहेत. मध्येच ऊन-पावसाचा खेळ सुरू आहे. कधी ढगाळ वातावरण तर कधी कडक उन्हाळा जाणवत आहे. अशा वातावरणाने हवेतील उष्मा देखील वाढत आहे. शीतपेये, लिंबूपाणी पिण्याकडे अनेकांचा कल दिसून येत आहे, मात्र बाजारात सध्या लिंबाची आवक घटल्याने दर वाढण्यास सुरुवात झाली आहे.

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमधील घाऊक भाजीपाला बाजारात सध्या राज्यातून जुन्नर, नगर मधून लिंबाची आवक होत आहेत. मंगळवारी बाजारात लिंबाच्या १० गाड्या दाखल झाल्या असून १७०क्विंटल आवक झाली आहे. शाकाहारी जेवण असो वा मांसाहारी, रोजच्या जेवणात लिंबांची आवश्यकता भासतेच. उन्हाचा तडाखा वाढल्याने लिंबू सरबताची मागणी ही आहे. बाजारात सध्या आकाराने लहान लिंबाची आवक अधिक होत आहे. आकाराने मोठे असलेल्या लिंबाचे प्रमाण कमी आहे.

आधी घाऊक बाजारात ८००नग लिंबूची गोणी ५००-६००रुपयांनी विक्री होत होती, मात्र आता दरात दुप्पटीने वाढ झाली असून १२००रुपयांनी विक्री होत आहे. घाऊक मध्ये दरवाढ झाल्याने किरकोळ बाजारात ही लिंबू भाव खात आहे. आधी पाच रुपयांना तीन नग उपलब्ध होते मात्र आता लिंबाचा एक नग पाच रुपयांना विक्री होत आहे. पुढील कालावधीत दर आणखीन वधरण्याची शक्यता आहे असे मत व्यापारी कैलास तांजणे यांनी व्यक्त केले आहे.

संपादकीय

ऐतिहासिक कामगिरी

कोविडच्या वाढत्या केसेसमुळे यापूर्वी अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्यात आलेल्या १९व्या आशियाई क्रीडा स्पर्धेचे अर्थात एशियन गेम्सचे भव्य-दिव्य आयोजन चीनमधील हांगझोऊ येथे नुकतेच पार पडले. २३ सप्टेंबरपासून ८ ऑक्टोबरपर्यंत आयोजिल्या गेलेल्या या स्पर्धेत भारताने पदकांचे शतक पार करून आजवरची सर्वाधिक नेत्रदीपक कामगिरी केली. क्रिकेटखेरीज अन्य खेळांकडे काहिसे दुर्लक्ष करणाऱ्या आपल्या देशात खरोखरीचे क्रीडाप्रेम, क्रीडासंस्कृती हळूहळू रुजू लागली आहे असे आता खात्रीने म्हणता येईल.

चीनने आशियाई क्रीडास्पर्धेत सुवर्णपदकांचे द्विशतक साजरे करत २०१ सुवर्ण, १११ रौप्य आणि ७१ कांस्य पदकांसह अव्वल स्थान पटकावले. स्पर्धेत जपान दुसऱ्या, दक्षिण कोरिया तिसऱ्या तर भारत चौथ्या स्थानावर राहिले. हांगझोऊ येथील आशियाई खेळात एकूण ४० खेळांचे आयोजन करण्यात आले होते. या खेळांच्या निरनिराळ्या ६१ शाखांमध्ये एकूण ४८१ स्पर्धा पार पडल्या. आयोजक चीनसह भारत, जपान, दक्षिण कोरिया, उत्तर कोरिया, इराण आणि इंडोनेशिया यांच्यासह एकूण ४५ देश या आशियाई खेळांमध्ये सहभागी झाले. या देशांमधील सुमारे १२ हजार खेळाडूंनी यात भाग घेतला. भारतातून ३८ खेळांमधील सहभागासाठी ६३४ खेळाडू चीनला गेले होते. यात थलेटिक्स स्पर्धेसाठीचा संघ सर्वात मोठा होता. यात एकूण ६५ खेळाडू होते. चीनमध्ये तर उत्तमोत्तम खेळाडू तयार करण्याची भली मोठी यंत्रणाच आहे. त्याच्या बऱ्या-वाईट दोन्ही बाजूंची नेहमीच चर्चा होते. आपल्याकडे मात्र अशातऱ्हेने मेहनतीने खेळाडू साकारण्याच्या प्रयत्नांना अलीकडच्या काळातच अधिक सजगतेने सुरुवात झाली असे म्हणावे लागेल. 'खेलो इंडिया'तून आपल्याकडे क्रीडासंस्कृती खऱ्या अर्थाने रुजू लागली असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. प्रतिभावान खेळाडूंना संधी मिळावी, त्यांना सर्वोत्तम प्रशिक्षण आणि पाठबळ मिळावे आणि त्यांच्यामार्फत देश जागतिक स्तरावर अधिक स्पर्धात्मक बनावा असा ठोस प्रयत्न 'खेलो इंडिया'तून झाला. २०१४ पूर्वी मात्र क्रीडास्पर्धांशी संबंधित विविध घटकांमधील समन्वयाच्या अभावातून तसेच प्रभावी असा एकत्रित दृष्टिकोनच नसल्यामुळे परिस्थिती निराशाजनक होती, पण आता मात्र निश्चितपणे भारतीयांचा खेळाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो आहे. दहावी-बारावीच्या शैक्षणिकदृष्ट्या महत्त्वाच्या टप्प्याच्या आधी तर बहुतांश पालक आपल्या मुलांना कुठला न कुठला खेळ खेळण्यासाठी निश्चितच प्रोत्साहन देतात. क्रीडाप्रकारातील प्राविण्यासाठीही मेहनत घेतली जाते. या साऱ्याचे परिणाम पदकांच्या संख्येत दिसू लागले आहेत. या वेळी आशियाई क्रीडा स्पर्धांच्या ११व्या दिवशी भारताने ७० हून अधिक पदके जिंकण्याचा विक्रम प्रस्थापित केला. यापूर्वी २०१८मध्ये देशाने आशियाई क्रीडा स्पर्धेत ७० पदके जिंकली होती. १९५१ पासून आशियाई खेळ नियमितपणे खेळले गेले आहेत. पहिल्या स्पर्धेचे आयोजन भारतात झाले होते. ७२ वर्षांपूर्वी झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने १५ सुवर्णपदकांसह ५१ पदके जिंकली होती, मात्र त्यानंतर ३१ वर्षे आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताला ५० पदकांचा आकडा गाठता आला नाही. १९८२च्या आशियाई क्रीडा स्पर्धेचे यजमानपद भारताला मिळाले तेव्हा भारताने ५७ पदके जिंकली. २०१८च्या ७० पदकांवरून भारताने यंदा १०७ पदकांपर्यंत मोठी झेप घेतली. देशातील क्रीडा जगतात, क्रीडा संस्कृतीत घडत असलेल्या सकारात्मक बदलांचेच हे फलित आहे. यंदा भारताने २८ सुवर्ण, ३८ रौप्य आणि ४१ कांस्य पदके मिळवली. यापुढे अधिकाधिक सुवर्ण पदकांवर आपण लक्ष केंद्रित करायला हवे आहे.

मंत्रालय सुरक्षा होणार अधिक सुसज्ज अन् अद्ययावत!

मंत्रालय हे राज्यातील प्रशासकीय मुख्यालय आहे. या आस्थापनेमध्ये मुख्यमंत्री, मंत्री, राज्यमंत्री यांची कार्यालये तसेच सर्व महत्त्वाची प्रशासकीय विभागांची कार्यालये आहेत. त्यामुळे मंत्रालय ही अत्यंत संवेदनशील व महत्त्वाची आस्थापना असल्याने या आस्थापनेची सुरक्षादेखील अत्यंत महत्त्वाची बाब आहे. त्यानुषंगाने शासन निर्णय २४ डिसेंबर, २०२१अन्वये मंत्रालयात अभ्यागतांना व वाहनांना प्रवेश देण्याबाबत सुधारित मार्गदर्शक सूचना पारित करण्यात आल्या होत्या. तथापि, तद्नंतरच्या कालावधीत मंत्रालयात घडलेल्या आपत्कालीन घटना विचारात घेऊन सुरक्षेच्या दृष्टीने मंत्रालय परिसराचा घेण्यात आलेला आढावा, अभ्यागतांची वाढती संख्या व मंत्रालयात उपलब्ध असलेली वाहनतळांची मर्यादित जागा आदी बाबी विचारात घेतल्यानंतर मंत्रालय सुरक्षेच्या अनुषंगाने शासनाकडून सुधारीत मार्गदर्शक सूचना पारित करण्यात आल्या आहेत. याबाबतचा २०२३०९२६१४११२५९०२९ या संकेतांक क्रमांकाचा शासन निर्णय २६ सप्टेंबर २०२३ रोजी जारी केला असून तो महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे. अधिक माहिती जाणून घेऊया पुढील लेखातून...

१)वेब पोर्टल व मोबाईल ॲप/ फ्लॅप बॅरियर बसविणे : मंत्रालय सुरक्षा फेज २ यामध्ये वेब पोर्टल व मोबाईल ॲपद्वारे अभ्यागतांची पूर्व नोंदणी करून नोंदणी केलेल्या वेळाप्रमाणे (टाईम स्लॉट) मंत्रालयामध्ये अभ्यागतांची संपूर्ण सुरक्षा तपासणी करून प्रवेश देण्याची कार्यवाही पोलीस उपायुक्त, मंत्रालय सुरक्षा यांनी करावी तसेच अभ्यागतांना ज्या विभागात जायचे आहे त्याच विभागात प्रवेश देण्यात येणार आहे. या व्यतिरिक्त इतर कोणत्याही मजल्यावर प्रवेश प्रतिबंध करण्यासाठी येण्या-जाण्याच्या प्रत्येक मार्गावर फ्लिप बॅरियर बसविण्यात येऊन प्रवेश प्रतिबंध करण्यात यावा. त्याचप्रमाणे आमदार महोदय आणि लोकप्रतिनिधी यांच्यासोबत येणाऱ्या व्यक्तीकरिता पूर्वनियोजित टाइमिंग स्लॉट बुकिंग करणे आणि मंत्रालयात येणाऱ्या सर्व व्यक्तींसाठी प्रवेश पास बंधनकारक करण्यात येत आहे. मंत्रालय सुरक्षेच्या अनुषंगाने फेज २ कार्यान्वित करण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्यात यावी,

जोपर्यंत फेज २ अमलात येत नाही तोपर्यंत सध्या कार्यरत असलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब चालू ठेवण्यात येणार आहे.

२) अद्ययावत व्हिजीटर प्लाझा : मंत्रालयातील गार्डन गेट येथील मोकळ्या जागेत अद्ययावत सुरक्षा तपासणी कक्ष (व्हिजीटर प्लाझा) पास काउंटर, अभ्यागतासाठी वेटिंग रूम, मंत्रालयात प्रवेश करणाऱ्या व्यक्तींच्या बॅगा ठेवण्यासाठी बॅगेज लॉकर, स्कॅनर आदी सुविधांसह सुसज्ज प्लाझा तयार करण्यासाठी व त्याबाबतचे रेखांकन करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कार्यवाही करण्यात येणार आहे.

३) मंत्रालयामध्ये प्रवेश करणाऱ्या अभ्यागतांची संख्या मर्यादित करणे : मंत्रालयामध्ये प्रत्येक दिवशी येणाऱ्या अभ्यागतांची संख्या तीन हजार ५००पेक्षा अधिक असल्याचे दिसून आले आहे, तसेच मंत्रीमंडळाच्या बैठकीच्या दिवशी मंत्रालयामध्ये येणाऱ्या अभ्यागतांची संख्या पाच हजारपेक्षा जास्त असल्याचे शासनाच्या निदर्शनास आलेले आहे. मंत्रालय इमारतीध्ये येणारे अभ्यागत तसेच त्यांच्या वाहनांची संख्या विचारात घेता, इतक्या मोठ्या प्रमाणावर एकाच इमारतीमध्ये एकाच वेळी गर्दी झाल्यास मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री, राज्यमंत्री तसेच प्रशासकीय विभागाच्या दैनंदिन कामकाजावर निश्चितच परिणाम होत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे मंत्रालयामध्ये प्रवेश करणाऱ्या अभ्यागतांची संख्या व वाहनांची संख्या मर्यादित करण्यात आली आहे, जेणेकरुन मंत्रालयातील सोयीसुविधांवर अनावश्यक ताण येणार नाही व अतिमहत्त्वाच्या व्यक्तींची सुरक्षा अबाधित राहील. यावर मंत्रालयामध्ये दर दिवशी किती अभ्यागतांना प्रवेश देण्यात यावा, याबाबत निश्चित कार्यप्रणाली पोलीस उपायुक्त, मंत्रालय सुरक्षा हे तयार करतील व ती कार्यप्रणाली गृहविभागास सादर करतील.

४) ऑनलाईन प्रवेश पास : नजीकच्या कालावधीमध्ये अभ्यागतांना प्रवेश पत्रिका देण्याची ऑनलाईन कार्यवाही सुरू करण्याचे प्रस्तावित आहे. जोपर्यंत ऑनलाईन प्रवेशपत्रिका देण्याची प्रक्रिया सुरू होत नाही, तोपर्यंत पारंपरिक पद्धतीने प्रवेशपत्रिका देण्यात येणार आहे. ऑनलाईन प्रवेशपासबाबत एनआयसी स्वागतम् पोर्टलद्वारे आवश्यक ती कार्यवाही करणार आहे.

५) वाहन पार्किंग, प्रवेश, निर्गमन : मंत्रालयात मुख्य प्रवेशद्वाराने फक्त मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व इतर मंत्री महोदयांची वाहने तसेच ताफ्यातील सुरक्षा वाहनांना प्रवेश देण्यात येईल. या वाहनांसाठी निश्चित केलेल्या जागेवर पार्किंग तसेच या वाहनांना पुन्हा मुख्य प्रवेशद्वाराने बाहेर जाण्यासाठी परवानगी राहिल. या व्यतिरिक्त मुख्य प्रवेशद्वाराने इतर कोणत्याही वाहनास प्रवेश व बाहेर जाण्यास परवानगी राहणार नाही. सचिव गेट येथून फक्त सनदी अधिकारी यांच्या वाहनांना प्रवेश देण्यात येईल. मंत्रालयात प्रवेशासाठी ज्या वाहनांना पार्किंग व ड्रॉपिंग प्रवेशिका पास आहे त्यांना व इतर खासगी वाहनांना (योग्य त्या परवानगीनंतर) मंत्रालयात येण्यासाठी गार्डन गेट येथून प्रवेश देण्यात येईल व मंत्रालयाबाहेर जाण्यासाठी आरसा गेटने बाहेर जाण्यासाठी नियोजन करण्यात येईल. ही कार्यवाही पोलीस उपायुक्त, मंत्रालय सुरक्षा यांनी तातडीने करावी. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांची वाहने उभी असतात त्या ठिकाणी इतर कोणत्याही वाहनांना उभे राहण्यास मज्ज्ञाव करण्यात यावा. कॉनव्हॉयमधील अधिकारी व अंमलदार यांना गाडी सोडून जाऊ नये, याबाबत सूचना द्याव्यात. ही कार्यवाही शासन निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून तत्काळ सुरू करण्यात येईल.

(६) वाहन चालकांना सूचना : मंत्रालयात पार्किंग आणि मंत्रालयाबाहेर पार्किंग असणाऱ्या वाहनचालकांना वाहनाच्या सुरक्षेबाबत अवगत करून त्यांना वाहन सोडून इतरत्र न जाण्याबाबत पोलीस उपायुक्त, मंत्रालय सुरक्षा यांनी सूचित करावे. संबंधित वाहनचालकाने त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या पूर्व परवानगीशिवाय त्यांच्या वाहनामध्ये अन्य कोणत्याही अभ्यागतांना घेऊन मंत्रालयामध्ये प्रवेश करू नये.

(७)कलर कोड एंट्री पास : मंत्रालयामध्ये प्रवेश करणाऱ्या व्यक्तींना आरएफआयडी स्वरुपाचे प्रवेश पत्रिका देण्याची कार्यवाही सुरू आहे. जोपर्यंत आरएफआयडी स्वरूपाची प्रवेश पत्रिका देण्याची कार्यवाही सुरू होत नाही, तोपर्यंत मंत्रालयमध्ये प्रत्येक मजल्यासाठी कलर कोड पत्रिका देण्याची व्यवस्था मंत्रालय सुरक्षा विभागामार्फत करण्यात येणार आहेत. ही कलर कोड पत्रिका ज्या मजल्यासाठी दिली जाईल, त्याच मजल्यावर संबंधित अभ्यागत प्रवेश करतील, जर अशा अभ्यागतांनी अन्य मजल्यावर प्रवेश केल्यास त्यांना तशा सूचना पोलिसांमार्फत देण्यासाठी अलर्ट सिस्टीमचा वापर तत्काळ सुरू करण्यात यावा यासाठी केंद्र शासनाच्या मुख्य प्रशासकीय कार्यालयात वापरण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार आवश्यक त्या सुधारणा पोलीस प्रशासनामार्फत करण्यात याव्यात. ही कार्यपध्दती तत्काळ अंमलात आणण्यासाठी अपर पोलीस आयुक्त (संरक्षण व सुरक्षा) यांनी कार्यवाही करावयाची आहे.

(८)आरएफआयडी टॅग : मंत्रालय सुरक्षा प्रकल्प फेज १ अंतर्गत असलेल्या अंमलबजावणी यंत्रणेकडून ६०० आरएफआयडी टॅग पुरविण्यात येणार होते. तथापि, चालू वर्षात पासेस पुरविण्यात आलेल्या वाहनांची संख्या अधिक असल्याने संबंधीत यंत्रणेने चालू वर्षी आवश्यकतेप्रमाणे आरएफआयडी टॅग उपलब्ध करून द्यावेत. यामधील काही टॅग राखीव ठेवण्यात यावेत. राखीव ठेवलेले टॅग वाहन बदलल्यास किंवा इतर कारणास्तव वापरण्यात यावेत. आरएफआयडी टॅग वाहनावर बसवून कार्यान्वित करण्याची संपूर्ण जबाबदारी पोलीस उपायुक्त, मंत्रालय सुरक्षा यांची राहील.

(९) अभ्यागतांना कार्यालयीन वेळेनंतर मंत्रालयामध्ये थांबू न देणेबाबत : मंत्रालयाचे कामकाज सध्याच्या कामकाज पद्धतीनुसार सायंकाळी ६:१५ वाजता संपते. त्यामुळे मंत्रालयामध्ये प्रवेश करू इच्छिणाऱ्या अभ्यागतांना सायंकाळी ५:३० वाजल्यानंतर मंत्रालयामध्ये प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. सायंकाळी ६:१५ नंतर सुरक्षा यंत्रणेतील पोलिसांनी मंत्रालयामध्ये गस्त करून अभ्यागतांना मंत्रालय परिसरात थांबू न देता मंत्रालयातील सर्व परिसर मोकळा करावा.

(क्रमश:)

-मनोज शिवाजी सानप,
जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे

बदलते तंत्रज्ञान

वर्ल्डकपसाठी एअरटेलने लॉन्च केले दोन प्लॅन्स

भारतात आयसीसी वर्ल्डकप स्पर्धा सुरू झाली आहे. क्रिकेटवेड्या भारतात वर्ल्डकप असल्याने येथील सर्वच क्रिकेटचे चाहते खूप उत्साहात आहेत. काहीजण स्टेडियमवर जाऊन, तर काही मोबाइल, लॅपटॉप, टीव्हीवर सामन्यांचा आनंद घेत आहेत. आता चाहत्यांचा आनंद अधिक वाढणार आहे, कारण एअरटेल आपल्या ग्राहकांसाठी वर्ल्डकपसाठी स्पेशल प्रीपेड रिचार्ज प्लॅन घेऊन आली आहे. या प्लॅन्सबद्दल जाणून घेऊयात.

भारतात आयोजित करण्यात आलेल्या आयसीसी पुरुष वर्ल्डकप स्पर्धेत १० संघ सहभागी झाले आहेत. प्रत्येक जण या सामन्याचा आनंद नेटवर्कच्या कोणत्याही अडचणींशिवाय घेऊ इच्छित आहे. त्यासाठी एअरटेलने दोन स्पेशल प्लॅन लॉन्च केले आहेत. क्रिकेटचा प्रत्येक चाहता सामना बघण्यापासून दूर राहू नये यासाठी ४९ रुपये आणि ९९ रुपयांचा स्पेशल क्रिकेट प्लॅन्स घेऊन आले आहे. याबाबतचे वृत्त 'बिझनेस टुडे'ने दिले आहे.

एअरटेलचे स्पेशल क्रिकेट प्लॅन्स

एअरटेलने खास करून क्रिकेटप्रेमींसाठी तयार करण्यात आलेल्या दोन लॉन्चिंग लॉन्चिंग केले आहे. हे प्लॅन अशा लोकांसाठी उपयुक्त आहेत जे वर्ल्डकप स्पर्धेतील प्रत्येक क्षण बघण्यासाठी उत्सुक आहेत. हे प्लॅन केवळ प्रीपेड ग्राहकांसाठीच उपलब्ध असणार आहेत.

४९ रुपयांचा एअरटेलचा प्लॅन : जे वापरकर्ते लहान किमतीच्या प्लानचा विचार करीत असाल तर एअरटेलने ४९ रुपयांचा प्लॅन लॉन्च केला आहे, जो क्रिकेट स्पेशल प्रीपेड प्लॅन आहे. या प्लॅनमध्ये वापरकर्त्यांना सहा जीबी डेटा वापरायला मिळतो. यामध्ये एक दिवसाची वैधता मिळते.

९९ रुपयांचा एअरटेलचा प्लॅन : एअरटेलने दोन दिवसांच्या वैधतेसह ९९ रुपयांचा स्पेशल क्रिकेट प्लॅन लॉन्च केला आहे, ज्यामुळे वापरकर्ते कोणत्याही अडचणीशिवाय सामना पाहण्याचा आनंद घेऊ शकतात. यात अनलिमिटेड डेटा मिळतो.

मोबाइल प्रीपेड प्लॅनशिवाय क्रिकेट चाहत्यांसाठी खास रिचार्ज प्लॅन लॉन्च करण्यासाठी एअरटेल डीटीएच स्टार नेटवर्कसाठी बोलणी करीत आहे. क्रिकेट रसिकांसांचा सामने बघण्याचा अनुभव अधिक चांगला व्हावा म्हणून एअरटेल एक्सट्रीम बॉक्सवर एक क्विक ॲक्सेस प्रोमो रेल सादर केले आहे.

चित्रपट दिग्दर्शक, निर्माते आणि अभिनेते गुरू दत्त

निमित्त

आपल्या चित्रपटांतून कलात्मकता आणि व्यावसायिकतेचा सुवर्णमध्य साधणारा संवेदनशील निर्माता-दिग्दर्शक (अन् अभिनेताही)! 'चौदहवी का चांद', 'कागज के फूल', 'सीआयडी', 'मि. अंड मिसेस ५५', 'आरपार' आणि 'प्यासा' यांसारख्या चित्रपटांनी चित्रपट समीक्षक, जाणकार तसंच सर्वसामान्य रसिकांना मोहिनी घालणारा प्रतिभावान चित्रपटकर्मी! गुरू दत्त यांचे आडनाव पदुकोण होते. त्यांच्या 'साहिब बिबी और गुलाम' या चित्रपटाला राष्ट्रपतीपदक मिळाले.

गुरू दत्त यांचा जन्म जन्म ९ जुलै १९२५ रोजी झाला. चित्रपटातील गाण्यांच्या अर्थवाही व कलात्मक चित्रणात त्यांचा हात धरणारा हिंदी चित्रसृष्टीत दुसरा कुणीही नव्हता. त्यांच्या निर्मिती विचारावर बंगाली साहित्य आणि वातावरणाचा प्रभावी परिणाम दिसून येतो. त्यांच्या उपजत प्रतिभेला अल्वींनी दिलेली ही कलाटणी 'प्यासा', 'कागज के फूल', 'साहिब, बीबी और गुलाम'सारख्या चित्रपटांच्या निर्मितीस कारणीभूत ठरली.

प्यासा.... एक अजरामर, परिपूर्ण, जगणे समृध्द करणारी कलाकृती... प्यासा ही एका कवीच्या जगण्याची कथा आहे. अल्वींनी केवळ गुरू दत्तच्या चित्रपटांनाच वेगळे वळण दिले असे नाही, तर हिंदी चित्रपटांतील तोवरची कृत्रिम संवादशैली बदलण्यातही त्यांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. 'प्यासा'ची कथा ही अबरार अल्वी यांना प्रत्यक्ष आयुष्यात भेटलेल्या एका वेश्येवर आधारित आहे. गुरू दत्त आणि अबरार अल्वी यांनी तिला 'प्यासा'तून कलात्मक परिमाण दिले. रुपेरी पडद्यावरचा कवी अशी ओळख बनलेल्या गुरू दत्त यांच्या चित्रपटांची गणना 'ऑल टाइम क्लासिक' चित्रपटांमध्ये करण्यात आली. त्यांच्या चित्रपटांची मोहिनी आजही रसिकांना अस्वस्थ करते. छायाचित्रणाच्या कलेत सावलीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. तिचा कल्पकतेने उपयोग केला, तर अप्रतिम कलाकृती साकारता येते. गुरू दत्त यांचा १९५९मध्ये आलेला 'कागज के फूल' हा चित्रपट याचे उत्तम उदाहरण म्हणता येईल.

वहिदा रेहमान या गुरू दत्त यांचे 'फाइंड' असल्याचे म्हटले जाते. गुरू दत्त व अल्वी हे दोघे एकदा हैदराबादला गेले असताना एक नृत्यांगना म्हणून अकल्पितपणे झालेली तिची पहिली भेट, त्यांना मुंबईला आणण्यात गुरू दत्त यांनी घेतलेला पुढाकार, त्यांच्यातली अभिनेत्री फुलावी म्हणून गुरू दत्तनं घेतलेले कष्ट, पुढं आपल्या या 'निर्मिती'त कळत-नकळतपणे झालेली त्याची भावनिक-मानसिक गुंतणूक आणि स्वाभाविकपणे त्याचे गुरुदत्त यांच्या व्यक्तिगत आयुष्यात उमटलेले पडसाद हे सारं एका चित्रपटाच्या गोष्टीसारखे वाटते.

गुरू दत्त हे एक महान चित्रपटकार असले तरी माणूस म्हणून त्यांच्यात इतरांप्रमाणेच गुण-दोष होते. वहिदा रेहमान ही गुरुदत्त यांच्यासाठी नक्कीच अनुरूप सहधर्मचारिणी ठरली असती असं अबरार अल्वी तसंच गुरुदत्त फिल्म्समधील अनेकांना वाटत असे, परंतु म्हणून त्यांनी गीता दत्तशी काडीमोड घेऊन वहिदाला जवळ करावं, असं त्यांनी कधीही सुचवलं नाही. वहिदाचा विरह, विस्कटलेला संसार टिकवण्यासाठीचा सामाजिक दबाव आणि याच दरम्यान मोठ्या अपेक्षेनं निर्माण केलेल्या कलात्मक चित्रपटाला मिळालेलं अपयश या सर्व जीवघेण्या ताणांनी गुरू दत्तचा बळी घेतला असावा, ही शक्यताही नाकारता येत नाही. गुरू दत्त यांचे १० ऑक्टोबर १९६४ रोजी निधन झाले.

-संजीव वेलणकर

क्लिक...क्लिक...!

पनवेल : शरद ऋतू हा हिवाळा सुरू होण्या आधीचा काळ. या दिवसांमध्ये, पावसाळा नुकताच संपलेला असल्याने वातावरण अतिशय आल्हाददायक असते. नवरात्र, दसरा, दिवाळी, कार्तिक पौर्णिमा.. हे उत्सव सोहळे या शरद ऋतूमध्ये होतात.

आरोग्य प्रहर

शरद ऋतू शरीरासाठी असतो तरी कसा?

शरद ऋतूमध्ये पावसाळ्यातील ओलसर-थंड वातावरणामध्ये बदल होऊन उष्णता वाढू लागते आणि वातावरण उष्ण होते. पावसाळ्यात सर्वत्र जमलेल्या पाण्याचा निचरा होऊ लागतो. सुर्याची तीव्र किरणे जमिनीवरचे पाणी शोषून घेतात. क्वचित कुठे ओलावा व चिखल राहतो, पण एकंदर पावसाळ्यात झालेला चिखल शरदातली उष्णता सुकवून टाकते. शरदातल्या सूर्यकिरणांच्या पोषणाने वनस्पती बहरून येतात. पावसाळ्यात शेतकऱ्याने जमिनीत रुजवेलेले बी वाढू लागते. शेतांच्या जमिनी हिरव्यागार पिकांनी भरुन जातात. एकंदरच वर्षा ऋतुनंतर वातावरणात उष्मा वाढून निसर्गाला ऊबदार व सुंदर करणारा तो शरद ऋतू.

शरद ऋतूचे वैशिष्ट्य म्हणजे या दोन महिन्यांमध्ये रात्री अनुभवास येणारे चंद्राचे शीतल अस्तित्व. या दिवसांमधला चंद्र हा विशेषेकरुन सृष्टीला थंडावा देणारा असतो. एकंदरच रात्री शीतलतेचा आनंद देणारे थंड वातावरण, तर दिवसा तळपत्या सूर्याची उष्णता अशा थोड्या विचित्र वातावरणाचा सामना शरीराला या ऋतुमध्ये करावा लागतो, जे स्वाभाविकरित्या आरोग्याला पोषक होणे कठिण असते.

शरद ऋतुमध्ये पूर्वेकडून वाहून येणारे वारे वर्षा ऋतुमधल्या ढगांना वाहून नेतात असा उल्लेख वर आला आहे. या वाऱ्याचे गुणदोष आयुर्वेद शास्त्राने सांगितले आहेत, तेसुद्धा समजून घेऊ; ज्यामुळे वाचकांना आपल्या पूर्वजांच्या अभ्यासाच्या व्यापकतेची कल्पना येईल, जी माहिती आज २१व्या शतकातही उपयोगी पडेल अशीच आहे.

शरद ऋतुमध्ये जे पूर्वेकडून वारे वाहून येतात, त्यांचे गुणदोष पुढीलप्रमाणे : शीतल (थंड स्पर्शाचा, थंड गुणांचा व शरीरामध्ये थंडावा वाढवणारा), अतिमधुरतेचे गुण ज्यामध्ये भरलेले आहेत असा, एकंदरच शरीराला बल देणारा असतो. असे असले तरी त्याच्यामध्ये वात वाढवण्याचा दोष असतो, ज्यामुळे वातप्रकृती व्यक्तींसाठी तो हितकारक नसतो. त्याचप्रमाणे ज्याला व्रण (जखमा) झाल्या आहेत, ज्याच्या अंगावर सूज आहे त्यांच्यासाठीसुद्धा शरदातले पूर्वेकडून वाहणारे वारे बाधक ठरतात.

निवडक

अलिबागमध्ये ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान

अलिबाग : येथील स्व. प्रभाकर पाटील सांस्कृतिक कलामंचातर्फे सेवानिवृत्त पोलिस उपनिरिक्षक शंकरराव टके, टाऊन प्लॅनिंग खात्याचे माजी अधिकारी, तसेच अलिबाग ज्येष्ठ नागरिक संघटनेचे नवनिर्वाचित अध्यक्ष प्रफुल्ल राऊत आणि राजिप माजी कर्मचारी, तसेच अलिबाग ज्येष्ठ नागरिक संघटनेच्या नवनिर्वाचित उपाध्यक्ष चारुशिला कोरडे या तीन ज्येष्ठांचा सन्मान शनिवारी (दि. ७) प्रभाकर पाटील सार्वजनिक वाचनालय अलिबाग येथे उत्साहात झाला. या वेळी मंचाचे अध्यक्ष सखाराम पवार, मंचाचे सल्लागार गजेंद्र दळी, जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष तसेच मंचाचे कार्यवाह नागेश कुळकर्णी, कोमसापचे सहकार्यवाह नंदू तळकर, श्रीरंग घरत, शरद कोरडे, ग्रंथपाल भालचंद्र वर्तक, माजी नगरसेवक आर. के. घरत, सार्वजनिक वाचनालय अलिबाग आणि जिल्हा ग्रंथालयाचे कार्यवाह संतोष बोंद्रे, मंचाचे सल्लागार श्रीरंग घरत, ज्येष्ठ पत्रकार सुभाष म्हात्रे, ॲड. राजेंद्र जैन, देवेंद्रनाथ पतसंस्थेचे संचालक विजयराज जैन, मंदार कुळकर्णी आदी उपस्थित होते.

मोर्बा येथून अल्पवयीन मुलीचे अपहरण

माणगाव : तालुक्यातील मोर्बा बौद्धवाडी येथील एका १५ वर्षीय मुलीला अज्ञाताने फूस लावून पळवून नेल्याची घटना रविवारी (दि. ८) पहाटे ४ ते ६ वा. च्या सुमारास घडली. याबाबत माणगाव पोलीस ठाण्यात अज्ञातावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी महिला यांची १५ वर्षांची अपरहित मुलगी तिची उंची अंदाजे पाच फूट, रंग गहू वर्णीय, अंगाने मध्यम, डोळे तिरळे व चष्मा घातलेला, कपाळावर मध्यभागी गोंदलेले, अंगात गुलाबी टॉप व हिरव्या रंगाची लेगीन्स हिला अज्ञाताने फूस लावून पळवून नेल्याची घटना घडली आहे. या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अधिक तपास वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील हे करीत आहेत.

नरेंद्राचार्य महाराज सिद्धपादुका दर्शन

माणगाव : श्री स्वामी नरेंद्राचार्य महाराज यांच्या सिद्धपादुका घेऊन वसुंधरा पायी दिंडी दक्षिण रायगडमध्ये मंगळवारी (दि. १०) येणार आहे. सर्व भाविकांना पादुका दर्शनाची सोय करण्यात आलेली आहे. मंगळवार (दि. १०) सायंकाळी ६.३० ते रात्री १०पर्यंत मंगेशी कार्यालय इंदापूर, बुधवार (दि. ११) सकाळी ५ ते ७ मंगेशी कार्यालय इंदापूर, यिाच दिवशी दुपारी १२ ते ३ श्री गोरक्षनाथ मंदिर ढालघर फाटा माणगाव, सायं. ६:३० ते रात्री १० रुक्मिणीबेन मंगल कार्यालय गोरेगाव, गुरुवार (दि.१२) सकाळी ५ ते ७ रुक्मिणीबेन मंगल कार्यालय गोरेगाव, दुपारी १२ ते ३ वहूर गाव महाड, सायंकाळी ६.३० ते रात्री १० माता रमाई विहार महाड नगर परिषद, शुक्रवारी (दि.१३) सकाळी ५ ते ७ माता रमाई विहार महाड नगर परिषद, दुपारी १२ ते ३ येरुणकर हॉटेल चांढवे, सायंकाळी ७ ते १० ज्येष्ठ नागरिक हॉल पोलादपूर, शनिवार (दि. १४) सकाळी ५ ते ७ ज्येष्ठ नागरिक हॉल, दुपारी १२ ते ३ कशेडी बंगला पोलादपूर येथे पादुका दर्शन घेता येणार आहे.

हातभट्टीची दारू जप्त; गुन्हा दाखल

माणगाव : हातभट्टीची दारू वनापरवाना बाळगल्याप्रकरणी आरोपीवर माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रविवारी (दि. ८) पेणतर्फे तळे येथे आरोपीच्या घराच्या पाठीमागील अंगणातील आंब्याच्या झाडाखाली उघडकीस आला. याबाबतची फिर्याद पोलीस शिपाई प्रणव लांडे (वय ३१) यांनी पोलीस ठाण्यात दिली. आरोपी विनायक नारायण मोरे (वय ७९, रा. पेणतर्फे तळे) याने विनापरवाना १४ लिटर गावठी हातभट्टीची दारू बाळगली होती. याप्रकरणी आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक फडताडे करीत आहेत.

अलिबागमध्ये १५ जणांना कुत्र्याचा चावा

जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल

अलिबाग : रामप्रहर वृत्त

अलिबाग शहरात रविवारी (दि. ८) भटक्या कुत्र्यांनी एका दिवसात १५ जणांचा चावा घेतला. ही घटना चेंढरे येथील रायवाडी व मेटपाडा येथे घडली. सहाजण गंभीर जखमी असून त्यांना अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात दाखल केले आहे. या घटनेत एका पांढऱ्या कुत्र्याने मोठी दहशत निर्माण केली असून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

रायवाडी परिसरात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढला आहे. मॉर्निंग वॉकला जाणाऱ्या पादचाऱ्यांसह अनेक नागरिकांवर भटक्या कुत्र्यांनी हल्ला केल्याच्या घटना घडत आहेत. रविवारी सकाळी दोन महिला कामगार, एक महिला वयोवृद्ध, हमालासह १५ जणांवर मोकाट कुत्र्यांनी हल्ला केला.

या हल्ल्यात गंभीर जखमी झाल्याने त्यांना अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करावे लागले. यातील काहींना किरकोळ दुखापत झाल्याने त्यांच्यावर उपचार करून सोडण्यात आले, मात्र दोन महिला व एक पुरुष तसेच अन्य तिघे असे सहाजण गंभीर जखमी झाले आहेत. ते रुग्णालयात उपचार घेत आहेत.

कुत्र्याने हल्ला केलेल्या सर्व जखमींना इंजेक्शन देण्यात आले आहे. भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यामुळे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अलिबाग नगर परिषदेने यावर योग्य ती उपाययोजना करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

> **नेहमीप्रमाणे सकाळी रायवाडी परिसरात मॉर्निंग वॉकला जात होते. ७.४५ वाजण्याच्या दरम्यान एका कुत्र्याने अचानक हल्ला केला. या हल्ल्यात त्याने पायाला चावा घेतला. त्यामुळे दुखापत झाली.**
>
> **–निर्मला पाटील, नागरिक चेंढरे**

> **मी हमाल आहे. अलिबागमधील मेटपाडा येथे मालाची वाहतूक करीत होतो. दुपारी १ वाजण्याच्या सुमारास एका कुत्र्याने माझ्यावर हल्ला करून चावा घेतला. त्यामुळे अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी आलो.**
>
> **–कन्हैया सिंग, नागरिक**

वरंध घाटात मिनीबस दरीत कोसळून अपघात

चालकाचा मृत्यू; तीन ते चार जण जखमी



महाड : रामप्रहर वृत्त

भोर-महाड मार्गावरील वरंधा घाटातील वारवंड ते शिरगाव दरम्यान शिरगाव (ता.भोर) हद्दीत पुणे स्वारगेटहून भोरमार्गे महाड चिपळूणकडे जाणाऱ्या सतरा सिटर मिनीबसचा (एमएच-०८ एपी १५३०) अपघात रविवारी (दि. ८) मध्यरात्री २ वा. च्या सुमारास झाला आहे.

ही मिनीबस रस्ता सोडून धरणाच्या बाजूला ५० ते ६० फूट खोल दरीत कोसळली आहे. धरणाच्या पाण्यापासून पाच फुटावर गाडी अधांतरी अडकल्याने मोठा अनर्थ टळला.

बसमधील काही प्रवाशांना दुखापत झाली आहे, तर बसचालकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. गाडीत चालकासहीत १० ते ११ प्रवासी होते. त्यातील तीन ते चार जण जखमी झाले. जखमींना भोर उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी पाठविण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चालकाला रस्त्याचा अंदाज न आल्याने गाडीवरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाल्याची माहिती समोर आली आहे. अपघात झाल्यानंतर गाडीतील चालकासह चार जण दरीतून रस्त्यावर आले.

रस्त्याने जाणाऱ्या वाहनचालकाने अपघात स्थळापासून जवळच असलेल्या सह्याद्री हॉटेल मालकाला अपघाताची माहिती दिली. त्यानंतर हॉटेल मालक दत्ता पोळ, अक्षय धुमाळ, भीमा पोळ, संतोष पवार या शिरगावच्या तरुणांनी घटनास्थळी धाव घेऊन अधांतरीत असलेल्या बसला प्रथम दोरीने बांधले व त्यानंतर अपघातग्रस्त गाडीतीतील प्रवाशांना सुखरुप बाहेर काढले.

घटनेची माहिती कळताच भोर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शंकर पाटील, पोलीस हवालदार दत्तात्रय खेंगरे, सुनील चव्हाण, चेतन कुंभार, अतुल मोरे तसेच सह्याद्री रेस्क्यूचे सचिन देशमुख व टीमने घटनास्थळी पोचून अपघातातील व्यक्तींना बाहेर काढण्यास मदत करून जखमींना रुग्णालयात पाठवले.

या वेळी घटनास्थळी आंबवडे आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अनिकेत मांगले, चिकन मंजुश्री चिकणे, दिलीप देवघरे उपस्थित होते.

जखमी प्रवाशांपैकी राजेंद्र लाला मिसाळ (पुणे), रमेश तुकाराम महाडिक, सुभाष कदम (पुणे), करिष्मा उत्तम कांबळे (पुणे) यांना पुण्याला उपचारासाठी हलवले आहे.

सुधागड तालुक्यातील ग्रामस्थांचा राष्ट्रवादीत प्रवेश

पाली : प्रतिनिधी

ऐन ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुधागड तालुक्यातील ग्रामस्थांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात सुतारवाडी गीताबाग येथे आमदार अनिकेत तटकरे प्रवेश केला.

नाडसूर ग्रामपंचायतीमधील भोईरांचा नवघर, बहिरम पाडा, धोंडसे आदिवासी वाडी या गावांतील शेकडो ग्रामस्थांनी खासदार सुनील तटकरे, कॅबिनेट मंत्री आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून तालुकाध्यक्ष संदेश शेवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवेश केला. अनिकेत तटकरे यांनी सर्व ग्रामस्थांचे राष्ट्रवादी पक्षात स्वागत केले. ज्या विश्वासाने राष्ट्रवादी पक्षात तुम्ही प्रवेश करत आहात त्या विश्वासाला कदापि तडा जाऊन देणार नाही, असा विश्वास आमदार अनिकेत तटकरे यांनी दिला.

राष्ट्रवादीत माजी सरपंच स्वप्निल शेळके, सिध्दी शेळके, चेतन शेळके, तुकाराम खंडागळे, रमेश खंडागळे,सुधीर खंडागळे, गणपत खंडागळे, चंद्रकांत घाडगे, किसन खंडागळे व चंद्रकांत शेळके आदींसह असंख्य ग्रामस्थांनी जाहीर प्रवेश केला.

रोह्यात विजेच्या लपंडावाने नागरिक हैराण

कार्यालयीन कामकाज ठप्प



रोहे : प्रतिनिधी

रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात सातत्याने वीज खंडित होत असल्याने नागरिक हैराण झाले आहेत. शहराचा ग्रामीण भागात अधून-मधून वीजपुरवठा खंडित होत आहे. त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांसह छोटे उद्योजकांना त्याचा फटका बसत आहे.

गेली कित्येक दिवस रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात सातत्याने वीज खंडित होत आहे. दिवसासह रात्रीही अधून-मधून वीज खंडित होत आहे. एका बाजूला ऑक्टोबरची हिट चालू झाली आहे, तर दुसरी बाजूला वीज जात असल्याने आधार असलेला पंख ही बंद होत असल्याने लहान मुलांमध्ये जास्त चिडचिड निर्माण होत आहे.

याबाबत सातत्याने आंदोलने, बैठका घेऊनही कोणतीच कार्यवाही होत नसल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण पसरले आहे. अनेकदा शासकीय कार्यालये, बँकांमध्ये सातत्याने वीजपुरवठा खंडित होत असल्याने व्यवहार ठप्प होत आहेत. सातत्याने वीज खंडित होत असल्यामुळे लॉन्ड्री, हॉटेल, आईस्क्रीम, पार्लर, सलून, दूध डेरी, प्रिंटिंग प्रेस या छोट्या व्यावसायिकांना फटका बसत आहे. आधीच आर्थिक मंदी त्यात व्यवसायाला फटका. त्यामुळे छोटे व्यावसायिक हवालदिल झाले आहेत. या महत्त्वाच्या प्रश्नाकडे वीजमंडळाने, लोकप्रतिनिधींनी लक्ष न दिल्यास भविष्यात ग्राहकांचा उद्रेक होण्याची शक्यता आहे.

आग्राव येथे मोफत नेत्र तपासणी, मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

रेवदंडा : प्रतिनिधी

ऑक्टोबर सेवा सप्ताहानिमित्त लायन्स क्लब अलिबाग, ग्लोबल सर्व्हिस टिम, लायन्स हेल्थ फांऊडेशन व ग्रुप ग्रामपंचायत चौल यांच्या सयुक्त विद्यमाने आग्राव येथे मोफत नेत्र तपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात शुक्रवारी (दि. ६) आले होते. या शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या शिबिराचा प्रारंभ सुरेंद्र म्हात्रे यांचे हस्ते दिपप्रज्वलन व श्रीफळ वाढवून करण्यात आले. या वेळी चौल उपसरपंच अजीत गुरव, सदस्य अतुल वर्तक, माजी सरपंच तुलशीदास ढेबरी, तसेच आग्राव ग्रामस्थ उपस्थित होते.

या वेळी अलिबाग लायन्सचे वतीने प्रियदर्शनी पाटील, अध्यक्ष संजय पाटील, सचिव प्रदिप नाईक, अविनाश राऊत, संजय पाटील, खजिनदार अविनाश आमले, मनोज ढगे, प्रमोद देशमुख, परेश भरिचा, गिरीष म्हात्रे आदींनी शिबिराचे ठिकाणी उपस्थित राहून सहकार्य केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अतुल वर्तक यांनी केले. शिबिरास डॉ. सायली राठोड, डॉ. सुमित जाधव, डॉ. रिद्धी पाटील व डॉ. प्रतिक कणसे यांनी विशेष परिश्रम घेतले.

आग्राव व परिसरातील शेकडो नागरिकांनी या मोफत नेत्र तपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचा लाभ घेतला.

रसायनीतील गुळसुंदे येथे ब्लॅक राईसचा यशस्वी प्रयोग

रसायनी : प्रतिनिधी

रायगड जिल्ह्यात हा ब्लॅक राईसचा नवीन प्रयोग यशस्वी झाला आहे. हा तांदुळ गुळसुंदे येथील शेतीतज्ज्ञ मिनेश गाडगीळ यांनी त्यांच्या शेतात लावला आहे.

हा तांदूळ जपानमध्ये तयार करण्यात येतो. याला ब्लॅक राईस हा फॉरबीडन्ट राईस म्हणून ओळखला जातो. जपानमधील फक्त राजघराण्यासाठी हा तांदूळ पिकवला जात होता. यामध्ये अन्थोसॅयनीन हे नैसर्गिक पिग्मेंट आहे. ज्यामुळे याला ब्लॅक कलर प्राप्त होतो व उकडल्यानंतर याला डार्क परपल कलर (जांभळा) येतो. उकडण्या आधी २४ तास तांदुळ भिजत ठेवून नंतर तो उकडला जातो.

या तांदुळात ॲन्टीऑक्सिडंट गुणधर्म आसल्याने याला विशेष मागणी आहे. त्याचबरोबर या तांदुळात आर्यन, व्हिटॅमीन, प्रोटीन, मिनरल्स मोठ्या प्रमाणात आढळतात, तसेच फायबर मोठ्या प्रमाणात आढळते व त्यामुळेच वेट लॉससाठी हा तांदूळ उपयोगी पडतो. या तांदुळात मधुमेह व कोलेस्टेरॉल कमी करण्याचे गुणधर्म आढळतात. त्याचप्रमाणे या तांदुळात ॲन्टीकॅन्सर गुणधर्म असल्याचा निष्कर्ष काढण्यात आलेलला आहे. विशेष करून डेझर्ट, केक, ब्रेड, नूडल्स यासाठी हा तांदुळ वापरला जातो.

इंडोनेशिया, चीन, म्यनमार तसेच भारतातील नॉर्थ इस्ट भागात हा तांदूळ पिकवला जातो. असा बहुगुणी तांदुळ हा मीनेश गाडगीळ यांनी त्यांच्या गुळसुंदे येथील शेतामध्ये पिकवला आहे व हा पूर्णपणे सेंद्रिय पद्धतीत साधारण १२०-१३० दिवसांत हा तांदूळ तयार झाला आहे. शेतकऱ्यांनी पारंपरिक तांदुळाच्या वाणाबरोबर इतर ही वरील प्रकारची नावीन्यपूर्ण वाण लावल्यास त्याला चांगला भाव मिळेल व शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल, असे मत मीनेश गाडगीळ यांनी व्यक्त केले.

विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान

माणगाव : प्रतिनिधी

मुंबईतील माणगावकरांची स्वयंसेवी संस्था रायगड शिवसह्याद्री प्रतिष्ठानतर्फे निजामपूर विभागातील विविध क्षेत्रातील योगदान असलेल्या व्यक्तिमत्त्वांचा सन्मान रविवारी (दि. ८) शिवसेना पक्षप्रतोद आमदार भरत गोगावले यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

यावर्षी ब्रम्हलीन नरेंद्रस्वामी साखळे महाराज यांना आध्यात्मिक, नायक मराठा समाजाचे माजी अध्यक्ष वसंत पोळेकर यांना समाजसेवा, इतिहास अभ्यासक रामजी कदम यांना ऐतिहासिक कार्य, साहित्य क्षेत्र आणि रणपिसे कोचिंग क्लासेसचे संचालक संतोष रणपिसे यांना शैक्षणिक क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल समाजभूषण या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या वेळी मागाठाणे आमदार प्रकाश सुर्वे, मुंबई मनपा नगरसेवक भास्कर खुरसुंगे, उद्योजक गणेश देवघरे, प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत जोरकर, दक्षिण रायगड युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे आदी उपस्थित होते.

या सन्मान सोहळ्यानिमित्त संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आमदार भरत गोगावले यांनी प्रतिष्ठानच्या उपक्रमाचे कौतुक केले, तसेच माणगावातील मुंबईस्थित रहिवाशांना तत्पर वैद्यकीय सुविधा पुरवणाऱ्या डॉक्टर टीमचा आवर्जून उल्लेख करून त्यांचा सत्कारही करण्यात आला.सन्मान सोहळ्याचे उत्तम ध्वनिचित्रमुद्रण तुषार भरेकर यांनी केले, तसेच दिपेश माने यांनी निवेदन करून उपस्थितांची मने जिंकली.

वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा राम प्रहर

Loss of Original Share Certificate

This is to inform that, I am a Owner of the Office No. D-010, Steel Chamber Towers, Steel Market, Kalamboli, Navi Mumbai - 410218. And the Original Share Certificate no 364 of 12 shares of the said Office is now misplaced or not traceable. FIR registered at kalamboli police station FIR no.0292/2023 dt. 16/03/23 Any body having any objections to issuances of duplicate Share Certificate in lieu of the above, may please write to the above address within in 10 days.

M/s. Shri. Jagrat Sanjay Agarwal
Mob. : 9540272134

MAHATRANSCO

PUBLIC NOTICE

The following Power consumer sunder 220/100/22kV Tambati substation in EHV (O&M) Dn., Panvel are informed that, the power supply of the following power lines will be shut down on Tuesday Dtd. 10.10.2023 for maintenance and repair work for the time indicated below. Please co-operate.

Sr. No.	Substation	Feeder No.	Date & Time	Areas
1	220/100/22kV Tambati Substation	22kV ACME	10 :00 TO 17:00 Hrs (7 Hrs) Dt. 10.10.2023	1) Industrial zone from Tambati to Ransai area. 2) Khirkhandi, Vanvate, Ajivali Village.
2		22kV Sajgaon		1) Industrial zone from Tambati to Kargaon area, 2) Vadhval village,
3		22kV Ransai		1) Tambati to Shirvali Village, Narangi to Kharivali Village.
4		22kV Paliphata		1) IndiaBulls to Durshet village to Gondav phata, Tiware village. 2) Mahanagar Gas pump, Afcon company
5		22kV Kamani oil		1) Kamani Oil Company.
6		22kV Madap -1		22kV Madap -2 in service. Area affected NIL

Sd/-
EXECUTIVE ENGINEER
E.H.V.(O&M) DN. PANVEL

निवडक

खोपटे येथे हँड एम्ब्रॉयडरी स्पर्धा

उरण : जनशिक्षण संस्थान रायगड यांच्या माध्यमातून सोमवारी (दि. ९) खोपटे येथे स्वच्छता रॅली व हँड एम्ब्रॉयडरी स्पर्धा घेण्यात आली तसेच कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला उपस्थित प्रशिक्षणार्थींना सहाय्यक कार्यक्रम अधिकारी कल्पना म्हात्रे यांच्या माध्यमातून स्वच्छतेची शपथही देण्यात आली. संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्ष गीतांजली ओक, संचालक डॉ. विजय कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली हे उपक्रम राबविण्यात आले. स्वच्छता रॅली व हँड एम्ब्रॉयडरी स्पर्धा या कार्यक्रमासाठी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी कल्पना म्हात्रे, प्रशिक्षिका नंदा ठाकूर, श्वेता डाकी व प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

साखरचौथच्या बाप्पाला निरोप

उरण : चिरनेर येथील श्रीराम सांस्कृतिक कला क्रीडा मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सार्वजनिक गौरा गणेशोत्सवाची सांगता रविवारी (दि. ८) बाप्पाच्या विसर्जनाने करण्यात आली. सायंकाळी सात दिवसांच्या या साखर चौथीच्या गणेश उत्सवातील बाप्पाला भावपूर्ण वातावरणात निरोप देण्यात आला. भव्य दिव्य मिरवणुकीत शोभेसाठी दिव्यांची रोषणाई करण्यात आली होती, तर बँजोच्या तालावर मंडळातील स्त्री-पुरुष सदस्यांनी ठेका धरला होता. रंगीत फटाक्यांची आतषबाजीही दिसून आली. विसर्जन स्थळी स्वच्छतेसह प्रकाशाची व्यवस्था करण्यात आली होती. अत्यंत मंगलमय, शांततापूर्ण व उत्साही वातावरणात गणेश विसर्जन सोहळा पार पडला.

लोकशाही दिनी सर्व अर्ज निकाली

नवी मुंबई : कोकण विभागीय लोकशाही दिन कोंकण भवनमध्ये उपायुक्त (सामान्य) अजित साखरे यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या वेळी नागरिकांनी आपल्या तक्रारी मांडल्या. त्यांच्या समस्या जाणून प्रकरणे उचित कार्यवाहीसाठी संबंधित कार्यालयाकडे पाठविण्यात आली. विभागीय स्तरावरील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. कोकण विभागीय स्तरावर आतापर्यंत झालेल्या लोकशाही दिन कार्यक्रमात एकूण प्रलंबित अर्जांची संख्या सात असून सोमवारी (दि. ९) आलेल्या अर्जांची संख्या दोन असे एकूण प्राप्त अर्ज नऊ होते. त्यापैकी सर्व अर्ज निकाली काढण्यात आले.

हिवताप, डेंग्यू रोखण्यासाठी विशेष मोहीम

विविध उपाययोजना राबविण्यावर नवी मुंबई पालिकेचा भर

नवी मुंबई : बातमीदार

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्राची भौगोलिक रचना, येथील विस्तृत खाडीकिनारा, रहिवाशी भाग व स्थलांतरित लोकसंख्या यामुळे नवी मुंबई मनपा कार्यक्षेत्र हे हिवताप, डेंग्यू या आजारांच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील आहे. हे लक्षात घेत आरोग्य विभागामार्फत संपूर्ण महापालिका कार्यक्षेत्रात शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे प्रत्यक्ष सर्वेक्षण, नियोजित साप्ताहिक वेळापत्रकानुसार डासअळीनाशक फवारणी व रासायनिक धुरीकरण, घरांतर्गत डास उत्पत्ती स्थाने शोधमोहीम याद्वारे नियमित स्वरुपात हिवताप, डेंग्यू या आजारांचा प्रसार रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना प्रभावीपणे राबविण्यावर भर दिला जात आहे.

महापालिका कार्यक्षेत्रात वाढलेली डास उत्पत्ती रोखण्यासाठी आरोग्य विभागाने धडक मोहीम राबविण्यास सुरुवात केलेली आहे.

हिवताप, डेंग्यू यासारखे रोग पसरविणाऱ्या डासांची उत्पत्ती मुख्यत्वे घरांतर्गत व घराभोवताली असलेल्या स्वच्छ साचलेल्या पाण्यामधील डासउत्पत्ती स्थानांमध्ये होत असते. त्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील गतवर्षीच्या तुलनेत हिवताप, डेंग्यू रुग्णसंख्येत वाढ झालेली असल्याचे निदर्शनास येत असलेल्या संवेदनशील भागात तेथील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या माध्यमातून १५ ते २६ सप्टेंबर या कालावधीत घरांतर्गत डास उत्पत्ती स्थाने विशेष शोधमोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेमध्ये नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरील १३९ डासअळीनाशक फवारणी कामगारांना त्यांच्या कामाचे विभागनिहाय नियोजन करून देण्यात आले होते व त्यांनी करावयाच्या प्रत्यक्ष कार्यवाहीचा कृती आराखडाही देण्यात आला होता. प्रत्येक कामगारास प्रतिदिन १५० ते २०० घरांची तपासणी करण्याचे लक्ष्य देण्यात आले होते. या मोहिमेत त्यांनी संवेदनशील भागातील ७२,१८२ घरांना भेटी देऊन तेथील संभाव्य १,६६,९६१ घरांतर्गत डास उत्पत्तीस्थानांची तपासणी केली.

त्यामध्ये ४०५ दूषित स्थाने आढळून आलेली असून, दूषित डासउत्पत्ती स्थानांवर आवश्यक त्या ठिकाणी अळीनाशक फवारणी करण्यात आली व इतर डासोत्पत्ती स्थाने नागरिकांना आरोग्य शिक्षण देऊन त्यांच्याकडून नष्ट करून घेण्यात आली. ही कार्यवाही मोहिमेनंतरही सुरूच आहे.

शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार हिवताप, डेंग्यूसारख्या आजाराच्या नियंत्रणाकरिता महापालिकेसोबत तेथील नागरिक तसेच इतर सरकारी संस्था व खासगी संस्थांचे सक्रिय सहकार्य मोलाचे असल्याने, सुजाण नवी मुंबईकर नागरिकांनी जागरुक राहून, त्यांच्या घरात व घराभोवतालच्या परिसरात पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी तसेच हिवताप, डेंग्यू आजाराचा रुग्ण किंवा इतर तापाचा रुग्ण आढळल्यास नजिकच्या नमुंमपा रुग्णालयात, नागरी आरोग्य केंद्रात तातडीने संपर्क साधावा आणि महापालिकेमार्फत आपल्या घरी भेटी देणाऱ्या आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांस सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या वतीने करण्यात येत आहे.

स्वच्छ हवेसाठी वाशीतील रहिवाशांचे आंदोलन

नवी मुंबई : बातमीदार

गेल्या महिन्याभरापासून नवी मुंबई शहरात वायू प्रदूषणाचा विळखा वाढतच आहे. नवी मुंबई महापालिका आणि महाराष्ट्र प्रदूषण मंडळाकडे वारंवार तक्रारी करूनदेखील कोणतीच कार्यवाही होताना दिसत नाही. त्यामुळे अखेर वाशी से.२६ येथील रहिवाशांनी स्वच्छ हवा हा माझा अधिकार या हक्कासाठी चिंतामणी चौकात शांतीमय मार्गाने प्रशासनाला जाग येईपर्यंत प्रत्येक रविवारी सायं. ७ ते ८ वेळेत रस्त्यावर आंदोलनाला बसून प्रदूषणाचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात येत आहे. आम्हाला मोकळा श्वास घेऊ द्या, आम्हाला जगू द्या अशी आर्त हाक करदाते नागरिकांनी दिली आहे.

हवा हा आमचा अधिकार
साफ हवा हमारा अधिकार

नवी मुंबई शहरात विशेषतः नेरुळ, वाशी आणि कोपरखैरणे या विभागात मोठ्या प्रमाणावर वायू प्रदूषण होत आहे. महाराष्ट्र प्रदूषण मंडळाच्या नोंदीनुसार नेरुळ, वाशीमधील हवा गुणवत्ता निर्देशांकही खालावला असल्याचे कित्येक वेळा निदर्शनास आले आहे.

दिल्लीपेक्षा नवी मुंबईची हवा प्रदूषित असल्याचे हवेच्या निर्देशांकावरून दिसून येत आहे. शहरात आधी रात्रीच्या वेळी धुरकट वातावरण आणि उग्र वास सुरू होता, मात्र आता सकाळी ६ वा. नंतर ही वातावरणात धुके आणि दर्प येत आहे. दिवसेंदिवस नवी मुंबई शहरातील प्रदूषण वाढत आहे. प्रदूषण करणाऱ्या औद्योगिक कंपन्यावर कठोर कारवाई व्हावी यासाठी वाशी से. २६ येथील नागरिकांनी प्रशासनाविरोधात तसेच स्वच्छ हवा हा माझा अधिकार ही मोहीम हाती घेतली आहे.

दर रविवारी वाशी से.२६ येथील चिंतामणी चौकात शांतीमय मार्गाने प्रशासनाला जाग येईपर्यंत प्रत्येक रविवारी सायं. ७ ते ८ वेळेत रस्त्यावर बसून आंदोलन करण्याचा निर्धार केला आहे.

जास्तीत जास्त नागरिकांनी या मोहिमेत सहभागी होऊन वायू प्रदूषणाविरोधात एकत्र यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

महापालिकेच्या मालमत्ता संरक्षणाची जबाबदारी विभाग अधिकाऱ्यांवर

नवी मुंबई : प्रतिनिधी

नवी मुंबई महापालिकेची समाज मंदिरे, मैदाने यांच्यासह अन्य सर्व मालमत्तांचे संरक्षण करण्यासह त्याविषयी अन्य महत्त्वाची कामे करण्याची जबाबदारी आयुक्त राजेश नार्वेकर यांनी आता विभाग अधिकाऱ्यांवर सोपवली आहे. त्यांनी या संदर्भातील आदेशाचे एक परिपत्रक काढले आहे.

त्यानुसार विभाग अधिकाऱ्यांना मालमत्ता विषयासाठी एक स्वतंत्र लिपिक देण्यात आला आहे. यांच्या सहाय्याने मालमत्तांचे वाटप करून भाडे वसुली करणे, एखाद्याने अनधिकृत ताबा घेतला असेल, तर त्याच्यावर कारवाई करणे प्रसंगी त्याच्यावर गुन्हे नोंद करणे, या मालमत्तांचे सरंक्षण करणे. दैनंदिन मार्केट मधील ओटले वाटप करणे, पे अ‍ॅण्ड पार्किंगविषयी प्राप्त तक्रारीची चौकशी आणि पंचनामा करण्याचे दायित्व मालमत्ता लिपिकाचे असणार आहे. बहुउद्देशीय इमारती, हॉल, वाटपाच्या तारखांचे नियोजन करणे व भाडेवसुली करणे, रजिस्टरमध्ये अद्यावत नोंदी ठेवणे आणि मासिक अहवाल मालमत्ता विभागास सादर करणे आवश्यक असणार आहे.

विशेष म्हणजे यातील काही कामे यापूर्वीच्या आयुक्तांनी वेळोवेळी परिपत्रकाद्वारे नेमून दिली होती, मात्र या कामात चालढकलपणा होऊन ती प्रलंबित राहिल्याने मुख्यालयातील अधिकारी आणि कर्मचारी यांना वरिष्ठांना उत्तरे देताना नाकीनऊ येत होते.

याची नोंद घेत आयुक्तांनी मालमत्ता विभागाच्या कामात सुसूत्रता यावी यासाठी वरील सुधारित आदेश काढले आहेत.

पनवेल : शहर मंडल कार्यकारिणी अध्यक्ष अनिल भगत यांनी जाहीर केली आहे. यातील सरचिटणीस अमरिश मोकल, अमित ओझे, उपाध्यक्ष प्रभाकर बहिरा, चिटणीस रूपेश नागवेकर, मनिषा पाटील, शोभा सातपुते, मयुरी उनडकर आणि कोषाध्यक्ष ज्योती देशमाने यांचे माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

तुर्भेतील झोपडपट्ट्यांमध्ये अनैतिक व्यवसायांना ऊत; कारवाईची मागणी

नवी मुंबई : बातमीदार

तुर्भे सेक्टर १९एफ येथील सिडकोच्या मोकळ्या भूखंडावर अनधिकृत झोपडपट्टी, व्यावसायिक गाळे व वाहनपार्किंग तळ निर्माण करण्यात आले आहे. यातून मोठ्या प्रमाणावर अनैतिक व्यवसायांचा त्रास सामान्य नागरिकांना सोसावा लागत आहे. याबाबत संकेत डोके यांनी सिडकोकडे पत्र देऊन तक्रार केली आहे.

या परिसरातील नागरिकांनी वेळोवेळी पालिकेकडे तक्रारीही केलेल्या आहेत, परंतु या सर्व तक्रारींना कार्यालयातील अधिकाऱ्यांनी केराची टोपली दाखवलेली आहे, असा आरोप नागरिकांनी केला आहे. या अनधिकृत झोपडपट्टी, व्यावसायिक गाळे व वाहन पार्किंगमुळे परिसरात अवैध धंद्यांनी उन्माद आणला आहे. रात्रीच्या वेळी देहव्यापार, अमली पदार्थांची सर्रास विक्री, चोरी, मारामाऱ्या या सर्व बाबींचाही समावेश आहे. या सर्व गोष्टी अतिशय गंभीर आहे. त्यामुळे याबाबत तातडीने कारवाई करण्याची मागणी होत आहे.

पनवेल : हॅप्पी मेडिकअर सेंटरचे संस्थापक सागर साठे यांचा वाढदिवस नवीन पनवेल येथील सेंटरमध्ये उत्साहात साजरा करण्यात आला. त्यांना कार्यकर्ते बाळासाहेब जगताप, संतोष भोईर, सुरेश तपासे व इतर कार्यकर्त्यांनी शुभेच्छा दिल्या. हॅप्पी मेडिकेअर सेंटर गेले सहा वर्षांपासून मोफत जर्मेनियम थेरेपीमार्फत मोफत उपचार देत आहे. या वेळी अर्चना मॅडम, त्यांचा स्टाफ, नागरिक उपस्थित होते.

फडके विद्यालयात शैक्षणिक साधने निर्मिती कार्यशाळा

पनवेल : रामप्रहर वृत्त

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी संचालित आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालय नवीन पनवेल येथे महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या नवी मुंबईतील तीन शाळांमधील शिक्षकांसाठी शनिवारी (दि. ७) शैक्षणिक साधन निर्मिती कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

प्रमुख मार्गदर्शक म्हणून पालघर तालुक्यातील निवृत्त प्राध्यापक डॉ. हेमंतकुमार पेडणेकर उपस्थित होते. भूगोल, गणित, विज्ञान, भाषा या शालेय अभ्यासक्रमातील विविध विषयांमधील अवघड संकल्पना मनोरंजक खेळातून व शैक्षणिक साधनांतून त्यांनी शिक्षकांसमोर स्पष्ट केल्या. अध्यापनात ओएचपीचा प्रभावी वापर याबाबत प्रात्यक्षिकाद्वारे अध्यापनाच्या रंजक पद्धती समजावून सांगितल्या.

तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षकांनी सकारात्मक विचारांच्या आधारे ताणमुक्त आपले अध्यापनाचे कार्य डोळसपणे अविरत सुरू ठेवण्यासाठी आग्रही असावे याबाबत पेडणेकर सरांनी शिक्षकांना प्रोत्साहित केले. कार्यशाळेच्या उत्तरार्धात प्रत्येक शिक्षकाने प्रत्यक्ष शैक्षणिक साधनांची निर्मिती केली. लॅमिनेशन मशीन वापरून त्याआधारे अनेक शैक्षणिक साधनांचा टिकाऊपणा कसा वाढवता येईल, याचे प्रात्यक्षिक दाखवले.

कार्यशाळेत महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या शिक्षण प्रबोधिनी पुणेचे अध्यक्ष हजरनीस, समन्वयक केदार तापीकर, मएसोच्या नवी मुंबईतील सर्व शाखांचे मुख्याध्यापक तसेच सर्व शाखांमधील मिळून एकूण ११० शिक्षक उपस्थित होते. कार्यशाळेच्या समारोपाला आपल्या अध्यक्षीय भाषणात राजीव हजरनीस म्हणाले, दृष्टीकोन बदलला तर अनेक संधी आपल्याला दिसतात. सकारात्मक विचारांच्या अध्यापकांना नवी पिढी निर्माण करताना समस्यांना संधी म्हणून पाहता येईल. शिक्षकांनी स्वतः च्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी आग्रही, अभ्यासू, सृजनशील असावे.

मएसो आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालय माध्यमिक विभाग मराठी माध्यमाच्या मुख्याध्यापिका समिता सोमण यांनी आभार मानले. सहाय्यक शिक्षिका रचना पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. स्वाती बापट यांच्या पसायदान गायनाने कार्यशाळेची सांगता झाली.

पटणी-कल्याण एनएमएमटीच्या सेवेला प्रतिसाद

नवी मुंबई : रामप्रहर वृत्त

नवी मुंबई महापालिकेच्या परिवहन सेवेने कल्याण येथून ऐरोलीतील पटणीतील कंपन्यांमध्ये कामाला येणाऱ्या नागरिकांसाठी बससेवा सुरू केली आहे. या सेवेला चांगला प्रतिसाद मिळत असून बसची संख्या वाढवण्याची मागणी होत आहे.

ऐरोली येथून कल्याणला जाण्यासाठी ऐरोली रेल्वे स्टेशनवरून ठाणे रेल्वे स्थानक गाठून डोंबिवली-कल्याणकडे जावे लागत होते. ही बाब लक्षात घेता एनएमएमटीने ऐरोली-पटणी ते कल्याण ही रबाळे एमआयडीसी मार्गे महापे, काटई, तिसावली नाकामार्गे कल्याणकडे जाण्यासाठी मार्ग क्रमांक-६५ ही सेवा सुरु केली आहे. सकाळ आणि रात्रीच्या वेळेत प्रवाशांसाठी दोन बस या मार्गावर धावत असल्याने सकाळी कल्याण येथून ऐरोलीत पटनी कंपनी आणि नवी मुंबई परिसरात कामानिमित्ताने येणाऱ्यांना दिलासा आहे.

मुंबईमध्ये स्वदेशीकरण सेमिनारसह प्रदर्शन

उरण : वार्ताहर

नौसेना गोदीबाडा, मुंबईने फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स आणि इंडस्ट्रीसोबत संयुक्तपणे नुकतेच सेमिनारसह प्रदर्शन-२०२३ आयोजित केले होते.

वाईस एडमिरल दिनेश त्रिपाठी या कार्यक्रमाचे मुख्य आतिथ्य होते. पश्चिम नौसेना कमानतर्फे सर्व प्रतिनिधींचे स्वागत रियर एडमिरल डी. के. गोस्वामी, एडमिरल अधीक्षक, नौसेना गोदीबाडा मुंबई यांनी केले.

कार्यक्रमात लगभग २०० प्रतिनिधींनी सहभाग घेतला. ज्यामध्ये डॉ. चंद्रिका कौशिक, एम. शंकरन, यू. आर. राव, जो. मोहन, अरुण टी. रामचंदानी आदींनी संबोधित केले. सेमिनारमध्ये भारतीय नौसेना कर्मचारी, उद्योग आणि प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थान, अर्थात आईआईटी (मुंबई) आणि बिट्स, पिलानीद्वारे १२ शोध निबंध सादर केले.

सरकारच्या स्वावलंबन दृष्टिकोन ध्यानात ठेवून आपल्या स्वदेशी क्षमतांचा आणि नवीन समाधानांना प्रदर्शनीसाठी उद्योग भागीदारांना, सार्वजनिक उपक्रमांच्या, रक्षा अनुसंधान आणि विकास भागीदारांना, सार्वजनिक उपक्रमांच्या, रक्षा अनुसंधान आणि विकास संस्थानांच्या (डीआरडीओ), भाभा परमाणु अनुसंधान केंद्र, भारतीय अंतरीक्ष अनुसंधान संस्थान, शिक्षाविद्यांच्या ज्ञानाच्या सर्व हितधारकांना एक मंच प्रदान केला.

फोरमने भारतीय नौसेनेला व्यावसायिक-ग्राहक (बिझनेस-टू-कॉन्झ्यूमर, अर्थात 'बी२सी') मॉडेलच्या माध्यमातून उद्योगासाठी शेवटच्या वापरकर्त्यांच्या आवश्यकतांना सरळ संपर्क साधण्याची संधी दिली.

चौकमध्ये विकास कामांचा झंझावात

आमदार महेश बालदी यांचे विशेष प्रयत्न

चौक : प्रतिनिधी

उरण विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश बालदी साहेब यांच्या सहकार्याने आणि भारतीय जनता पक्षाचे उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे व तालुका अध्यक्ष प्रवीण मोरे यांच्या प्रयत्नाने आमदार निधीतून विकास कामांना मंजुरी मिळाली आहे.

आमदार महेश बालदी यांच्या सहकार्याने चौक शहराचा विकास करण्यासाठी स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत विकास कामांना मंजुरी मिळाली असून या कामांचा पाठपुरावा भारतीय जनता पक्षाचे उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे व तालुका अध्यक्ष प्रवीण मोरे यांचे विशेष प्रयत्न कारणीभूत आहेत. अशी माहिती ग्रुप ग्रामपंचायत चौक सरपंच रितु ठोंबरे यांनी दिली. ग्रूप ग्रामपंचायत चौक वर आमदार महेश बालदी यांनी विशेष प्रयत्न केल्याने त्यांचे आभार व्यक्त केले. चौक ब्राह्मण समाज सभागृह बांधणे, चौक बौद्धवाडी येथे समाज मंदिर बांधणे, चौक गावच्या तलावाचे सुशोभीकरण करणे, चौक बाजार पेठ येथुन ग्रामीण रुग्णालय चौक पर्यंत आणि पुढच्या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करणे ,संतोष हातमोडे यांच्या घरापासून ते जुना मुंबई पुणे महामार्ग पर्यंत रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करणे, गेटाच्या विहिरी जवळून जाणाऱ्या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण,चौक ग्राम पंचायत जवळील प्रबोधनकार ठाकरे नाट्यगृहाचे नूतनीकरण अशा कामांचा समावेश आहे. चौक बाजारपेठ ते ग्रामीण रुग्णालय असा रस्ता झाल्यास या परिसरात असणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालय, प्राथमिक शाळा, माध्यमिक विद्यालय यांच्या विद्यार्थी, तुपगाव व चौक ग्रामपंचायत येथे येणारे नागरीक, तसेच तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालयात येणाऱ्या नागरिकांच्या सोयी बरोबर ग्रामीण रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना सोयीचे होईल. याचप्रमाणे गेली अनेक वर्षे प्रबोधनकार ठाकरे खुले नाट्यमंच अतिशय वाईट दुरवस्था मध्य आहे. त्यामुळे अनेक कलाप्रेमी यांच्यासाठी आनंदाची बाब आहे.

पनवेल महानगरपालिका

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण ११ व अनुसुची 'ड' कराधान नियम ८ अन्वये ५ (पाच) वर्षाकरीता सुधारित कर आकारणीची प्राथमिक यादी जाहीर प्रसिध्दी बाबत सुचना नोटीस.

जाहीर सूचना

पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती अ, ब, क, ड सिडको क्षेत्रातील नविन व सुधारीत बांधकाम करण्यात आलेल्या मालमत्ता धारकांना व त्यांच्या भोगवटदारांना या जाहीर नोटीस द्वारे कळविणेत येते की,

आपल्या भोगवट्यातील इमारती व भूखंडाचे तपासणी करून करमुल्यांकन करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण ८ मधील कराधान नियम ९ अन्वये पनवेल महानगरपालिकेने सन २०२३ –२४ ते सन २०२७–२८ या पाच वर्षाकरीता इमारतीचे व भुखंडाचे कर निर्धारणाकरीता करमुल्याकंनाच्या यादीची प्रसिद्धी दि.०९/१०/२०२३ रोजी करण्यात येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण ८ कराधान नियम क्र. १५ (१) अन्वये प्रत्येक करदात्यास वैयक्तिक स्तरावर नोटीस बजावण्यात येतील व उक्त जाहीर प्रसिद्ध केलेली प्रारूप करमुल्यांकन यादी महानगरपालिका मुख्य कार्यालय, देवाळे तलावाजवळ, पनवेल या कार्यालयात पाहणीसाठी उपलब्ध आहेत.

या बाबत आपल्या इमारतीचे किंवा जागेचे, करयोग्य मूल्य अथवा करआकारणी, क्षेत्रफळ तसेच मालकी हक्क इ. बाबत आपली काही हरकत असल्यास कारणासह लेखी अर्जाव्दारे उपायुक्त (कर) पनवेल महानगरपालिका तसेच online हरकत नोंदविण्यासाठी ई–मेल pmc.tax2016@gmail.com यांच्याकडे यादी प्रसिद्ध केल्यापासून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण ८ कराधान नियम १५ (२) अन्वये २१ दिवसाच्या आत किंवा तत्पूर्वी कार्यालयीन वेळेस वरील ठिकाणी हरकत नोंदवून पोचपावती घ्यावी.

वरील मुदतीत लेखी हरकत / ई–मेल वर हरकत अर्ज प्राप्त न झाल्यास सदर आकारणी आपणास मान्य आहे असे गृहीत धरून प्रस्तावित केलेली करआकारणी अंतीम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

तसेच उपरोक्त प्रमाणे सुधारित करमुल्यांकनाबाबत आपण हरकत न नोंदविल्यास अथवा सुनावणी हरकत नियमाला धरुन नसल्यास सुनावणी अंती सुधारित चालू मागणी व मालमत्तांची सन २०२३–२४ पर्यंत वसुली व थकबाकी यांचे समायोजन करुन सर्व मालमत्ता धारकांना सन २०२३ –२४ करीताचे देयक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण ८ नियम ३०,३९,४० व ४१ अन्वये शास्तीसह यानंतर बजावण्यात येईल.

टिप:– वरील प्रमाणे कुठल्याही मालमत्ता धारकांना / भोगवटदारांना हरकत नोंदवायची असल्यास सदर लेखी अर्जा / Online (pdf copy) सोबत पुढील नमुद दस्ताऐवज जोडणे आवश्यक आहे.

१. आक्षेप संबंधित यथोचित मुद्दे निहाय आक्षेप अर्ज.
२. मालमत्ते संबधात मालकी हक्कांचे दस्ताऐवजाची स्वसाक्षांकित प्रत. (मालमत्तेची नोंद मनपा रेकॉर्ड मध्ये नसल्यास)
३. सुधारित कर मूल्यांकन नोटीसची छायाप्रत.
४. यापुर्वी कर आकारणी झाली असल्यास मागील मागणी देयक किंवा कर भरणा केल्याची पावती.

संपर्क अधिकारी :–
१. श्री. संग्राम व्होरकाटे (सहा. आयुक्त, मालमत्ता कर विभाग)
२. श्री. सुनिल भोईर (प्र. कर अधिक्षक)
३. श्री. महेश गायकवाड (प्र. कर अधिक्षक)
४. भ्रमणध्वनी क्र. १८००–५३२०–३४०
५. फोन क्र. ०२२–२७४५८०४०/४१/४२
६. ई–मेल: pmc.tax2016@gmail.com

सही/–
(गणेश देशमुख)
आयुक्त
पनवेल महानगरपालिका

ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद
ता. पनवेल, जि. रायगड

(महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९)

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमुद केलेल्या मालमत्तांचे पालीदेवद ग्रामपंचायतीकडील कर आकारणी नोंद वहीतील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

सप्टेंबर २०२३

अ.क्र.	मालमत्ता घेणाऱ्याचे नाव	मालमत्ता देणाऱ्याचे नाव	दस्तऐवज अनुक्रमांक	दस्तऐवज दिनांक	मालमत्ता वर्णन
१	ऋषिकेश विजय गोरेगावकर / कांचन ऋषिकेश गोरेगावकर	प्रमिला मोरेश्वर पाटील	पवल३– ४९०३–२०२३	१७/०३/२०२३	सदनिका क्र.१ तळ मजला, बिल्डिंग नं जी २, वसुंधरा को. ऑ.हौ.सो.लि. मौजे. शिलोत्तर रायचूर
२	१. राजेश्री रामचंद्र वाशिवले २. मनोज कुमार थपलियाल, लक्ष्मी मनोज थपलियाल	१. विजया मुरलीधर जाधव २. राजश्री रामचंद्र वाशिवले	१.पवल२–१७७२.२०२२ २.पवल२–१०८४४–२०२२	१.०४/०२/२०२२ २.२९/०७/२०२२	१. सदनिका क्र १०१. पहिला मजला, बी विंग, बिल्डिंग नं २, बालाजी लाईफ स्टाईल को. ऑ. हौ.सो.लि. मौजे पालीदेवद
३	घनश्याम जिजाबा सावंत / भाग्यश्री घनश्याम सावंत	मे. न्यू. बजेट होम बिल्डर्स तर्फे शशिकांत गंगाराम चौधरी	पवल३– ७८५०–२०१३	२५/१०/२०१३	सदनिका क्र. १०५, पहिला मजला, बी विंग. अंजनी कॉम्पलेक्स को. ऑ.हौ. सो लि मौजे शिलोत्तर रायचूर
४	दिप्ती दिपक शेळके / अक्षय दिपक शेळके	मुंजाभाऊ बापुराव तिरमले /सुगंधा मुंजाभाऊ तिरमळे	पवल१– ३७६९–२०२३	२७/०४/२०२३	शॉप नं १३, तळ मजला, कार्तिक्य गार्डन फेज–१, को. ऑ.हौ.सो.लि मोजे पालीदेवद
५	राकेश कुमार जगदिश दुबे	मानव इंटरप्रायझेस तर्फे अनिल त्रिभुवन पांडे	पवल३–६१४१–२०१८	८/६/२०१८	सदनिका क्र. ०८, दुसरा मजला, सुख अपार्टमेंट, (मानव इंटरप्रायझेस) मौजे पालीदेवद
६	तेजस विठठल निंबाळकर / विठठल रामचंद्र निंबाळकर / संगीता निंबाळकर	अनिल नामदेव शेलार/ प्रशांत शेलार / साधना अनिल शेलार	पवल३–१५६५८–२०२३	२५/०८/२०२३	सदनिका क्र. १०२, पहिला मजला, सी विंग, बिल्डिंग नं ४, साई इन्क्लेव को. ऑ. हौ. सो. लि. मौजे शिलोत्तर रायचूर
७	वैशाली महेंद्र कांबळे, महेंद्र अशोक रत्ना	सुवर्णा जंयत तामस्कर / नवीन जयंत तामस्कर / नवेली जयंत तामस्कर	पवल२–१८०५०–२०२२	२७/१२/२०२२	रो हाउस क्र ६०, विघ्नहर्ता इन्कलेव्ह को. ऑ. हौ.सो.लि. मौजे शिलोत्तर रायचूर
८	संदेश बाळकृष्ण सावंत श्रीगा संदेश सावंत	मे. आगा रियालिटी तर्फे श्री. तौसिफ जलालुददीन आगा	पवल२–१९१२–२०२३	८/६/२०२३	सदनिका क्र. ००२ तळमजला, ओम साई इन्कलेव को. ऑप. हौ.सो लि. मौजे पालीदेवद
९	अक्षय अरूण आंगणे/ नेहा सुखाजी सावंत/ वाईफ ऑफ अक्षय अरुण आंगणे	बिजल पारस वोरा/ पारस कनकलाल वोरा	पवल१–५८२४–२०२३	२१/०७/२०२३	सदनिका क्र. २००५, विसावा मजला, जे. विग बालाजी सिम्फोनी, को. ऑप. हौ.सो लि. मौजे शिलोत्तर रायचूर
१०	विश्रांती विश्वास तानाप्पागोळ	अलका अरुण मस्के	पवल२–१२२६२–२०२०	२१/१२/२०२०	सदनिका क्र – १०३ पहिला मजला, बिल्डींग नं २ गोकुळधाम कॉम्प्लेक्स को. ऑप. हौ. सो. लि. मौजे शिलोत्तर रायचूर
११	तुकाराम सिताराम शिवलकर	मे. रत्न बिल्डर्स तर्फे भागीदार विनोदकुमार मनोहरलाल जैन	पवल३–३६२१–२०२३	२७/०२/२०२३	सदनिका क्र.१०१ पहिला मजला, ए विंग श्री वसंत बिहार को ऑप. हौ. सो. लि. मौजे शिलोत्तर रायचूर
१२	सुवर्ण किशोर पाटील	मे. हरिओम बिल्डर्स तर्फे राकेश एन. बन्सल	पवल२–११६९७–२०२१	२६/०८/२०२१	शॉप क्र ०७ तळ मजला, पुष्प कलश २, को. ऑप. ही. सो. लि मौजे शिलोत्तर रायचूर
१३	स्नेहा सुनिल गायकवाड आदिती सुनिल गायकवाड/अलिशा सुनिल गायकवाड	सुनिल विटठल गायकवाड	पवल३–७६११–२०२३	२६/०४/२०२३	सदनिका क्र २:२, दुसरा मजला, बिल्डींग नं.९ टाईप जी, वृंदावन कॉम्पलेक्स फेज २, राधाकृष्ण को. ऑप. हौ. सो. लि. मौजे पालीदेवद
१४	राहुल सुरेंद्र सुर्यवंशी/ कोमल राहुल सुर्यवंशी	हिरामण महादु पाटील/ गौरव हिरामण पाटील	पवल४–३८७३–२०२१	२३/०३/२०२१	सदनिका नं. २०१, बी विंग, दुसरा मजला, निम्बेश्वर पार्वती को ऑप. हौ.सो.लि. मौजे पालीदेवद

वरीलबाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पालीदेवद ग्रामपंचायत कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचाराधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असलेस सदर नोटीसीच्या प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत ग्रामपंचायतीच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९ नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

सही/–
(सुदिन धनाजी पाटील)
ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत पालीदेवद,
ता. पनवेल, जि. रायगड

सही/–
(सौ. योगिता राजेश पाटील)
सरपंच
ग्रामपंचायत पालीदेवद,
ता. पनवेल. जि. रायगड

राम प्रहर
वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा

EXTENSION TO E –TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST

Sr .No	Particulars	Description
1	Tender No. & Name of Tender	RFxNo:- 7000028653 Tender No.:EE/EHV (O&M)/DN/PNL/e-Tender-46/2023-2024. Extension to RFx e-tender for work of Supply of various type of CGL make Tripping/ Closing coil under EHV O&M Division Panvel. Tender amount Rs. 4,05,896/-,EMD amount Rs. 5,000/-.
2	Online Downloading the RFx	09.10.2023, 18:00 Hrs. to 16.10.2023, 23:59Hrs.
3	Online Submission of the Rfx	On or Before 16.10.2023 up to 23:59 Hrs.
4	Online Opening of the Techno Commercial Rfx	17.10.2023 at 11:00 hrs.(if Possible)

For further details visit our website :- https://srmetender.mahatransco.in Contact Person :- The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410. **Note** : All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
EXECUTIVE ENGINEER
E.H.V.(O&M) DN. PANVEL

ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद
ता. पनवेल, जि. रायगड

(महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९)

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमुद केलेल्या मालमत्तांचे पालीदेवद ग्रामपंचायतीकडील कर आकारणी नोंद वहीतील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

ऑगस्ट २०२३

अ.क्र.	मालमत्ता घेणाऱ्याचे नाव	मालमत्ता देणाऱ्याचे नाव	दस्तऐवज अनुक्रमांक	दस्तऐवज दिनांक	मालमत्ता वर्णन
१	भूषण आनंद शिंदे, शालिनी आनंद शिंदे	निलीमा जनार्दन पोळेकर	पवल३– १६३७९–२०२२	२८/०९/२०२२	सदनिका क्र. ए २०२, दुसरा मजला, साक्षी पार्क २, बि.नं. १, को. हौ.सो. लि. मौजे शिलोत्तर रायचूर.
२	रेणुका ब्रम्हानंदम कट्टा	मनोज मोहन पांचाळ, महेश मोहन पांचाळ	पवल३–२८२६ – २०२३	१७/०२/२०२३	सदनिका क्र. ई २०२, दुसरा मजला, ई विंग, कार्तिक्य पार्क को हौ. सो, बि.नं. ३, मौजे शिलोत्तर रायचूर.
३	रविंद्र आत्माराम कुंभार, दिप्ती रविंद्र कुंभार	अंजनी संजय कांबळे, उमा महेंद्र भोसले	पवल५– ७६८१–२०२३	६/५/२०२३	सदनिका क्र. डी ०३, तळ मजला, साक्षी पार्क २ को. हौ. सो, बि.नं. २, मौजे शिलोत्तर रायचूर.
४	जुबेदा शकील बेग, मुबारक शकील बेग	नवनाथ बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे श्री. पंढरीनाथ चांगदेव ठाकूर	पवल२– ९१०४–२०२३	२९/५/२०२३	सदनिका क्र. बी १०२, पहिला मजला, नवनाथ रेसिडेन्सी, मौजे पालीदेवद
५	गिरधारी उम्मेदा राम चौधरी, गुणेशा राम चौधरी	मे. राम रत्न बिल्डर्स तर्फे विनोद तुकाराम चांदे	पवल३–२६८०–२०२३	१५/२/२०२३	शॉप क्र. ०६, तळ मजला, ए विंग, श्री वसंत विहार को. हौ. सो, मौजे शिलोत्तर रायचूर.
६	संतोष सुदर्शन पटेल, किरण संतोष पटेल	मे. जय संतोषी माता डेव्हलपर्स तर्फे श्री. चंद्रकांत चाहू पोपेटा	पवल२–७८४३–२०२०	८/१०/२०२०	सदनिका क्र.१०३, पहिला मजला, वैष्णवी आर्शिवाद, मौजे शिलोत्तर रायचूर
७	भूषण श्यामकांत थळे, सुकन्या भूषण थळे	राजेंद्र नारायण कपिलेश्वरी, नेहा राजेंद्र कपिलेश्वरी	पवल३–२०६०–२०२३	६/२/२०२३	सदनिका क्र. एफ १०३, पहिला मजला, गंगा धाम को. हौ. सो, बि.नं. १, मौजे पालीदेवद.
८	संकेत संजय थळी	निलीमा समीर ठाकूर, समीर पंढरीनाथ ठाकूर	पवल३–१३९१९–२०२३	२८/७/२०२३	सदनिका क्र. बी २०१ दुसरा मजला, पुष्पश्री को. हौ. सो, मौजे पालीदेवद.
९	आशा विजय कणेकर	राजेंद्र गंगाराम निकम मयत यांच्या तर्फे कायदेशीर वारस प्रतिमा राजेंद्र निकम, रिंकी राजेंद्र निकम, राज राजेंद्र निकम, रुची राजेंद्र निकम	पवल५–७७३२–२०२३	७/५/२०२३	सदनिका क्र. २०२, बी विंग, दुसरा मजला, साक्षी पार्क को. हौ. सो, बि. टाईप १, मौजे पालीदेवद.
१०	रोशन रामदास ठाकूर, प्रणाली रोशन ठाकूर	गीता सचिंद्रनाथ मंडल, सागर सचिंद्रनाथ मंडल	पवल४–९३१८–२०२३	७/७/२०२३	सदनिका क्र. के १९०८, एकोणीसावा मजला, के विंग, बालाजी सिम्फोनी को. हौ. सो, मौजे शिलोत्तर रायचूर.
११	राज अशोक साखरे, अश्विनी अशोक साखरे	अशोक पांडुरंग चव्हाण	पवल१–५४७५–२०२३	६/७/२०२३	सदनिका क्र. १०२, पहिला मजला, बी विंग, शिवकृपा को हौ. सो, मौजे शिलोत्तर रायचूर.
१२	स्नेहल प्रकाश काटकर	प्रकाश हनुमंत काटकर	पवल१–०१५८९–२०१०	११/२/२०१०	सदनिका क्र. २०२, दुसरा मजला, बि. नं. १, गंगाधाम को. हौ. सो, मौजे पालीदेवद
१३	आकाश जकाप्पा खांडेकर, विमल जकाप्पा खांडेकर	नील बिल्डर्स डेव्हलपर्स तर्फे विलास मदनलाल कोठारी	पवल४–५७२–२०२१	१४/१/२०२१	सदनिका क्र. २०३, दुसरा मजला, नील अपार्टमेंट, को.हौ. सो, मौजे पालीदेवद
१४	प्रशांत बळवंत यादव, मंगल बळवंत यादव	प्रविणसिंग शंकर घार्गे	पवल३–१४५११–२०२३	७/८/२०२३	सदनिका क्र. ए २०४, कपिश अपार्टमेंट, दुसरा मजला, मंगलदीप को. हौ. सो, मौजे पालीदेवद
१५	मिथुन गोपीनाथ नायर	अमोल साहेबराव आरोटे	पवल१– ६०४३–२०२३	२७/०७/२०२३	सदनिका क्र. २००४, जे विंग, विसावा मजला, बालाजी सिम्फोनी को. हौ. सो, मौजे शिलोत्तर रायचूर
१६	आख्या सत्यनारायण सिंह, सत्येंद्र अनंत प्रताप सिंह	बबन भोरु ढाकवळ, अंजना बबन ढाकवळ	पवल५–३२३५–२०२२	२५/०२/२०२२	सदनिका क्र. २०२, बी विंग, दुसरा मजला, बि. नं. ३, साई इन्क्लेव्ह को. हौ. सो, मौजे शिलोत्तर रायचूर
१७	अनंत प्रताप उमराव सिंह, उषा अनंत प्रताप सिंह, शिवेंद्र अनंत प्रताप सिंह	सौरभ सुमेरचंद जैन, रुपा जैन	पवल–५–१२६३६–२०१८	२५/११/२०१८	सदनिका क्र. १०१ सी विंग, पहिला मजला, बि. नं. ३, साई इन्क्लेव्ह को. हौ. सो, मौजे शिलोत्तर रायचूर
१८	राज महादेव म्हात्रे रिया राज म्हात्रे	भावेश रजनीकांत परमार, हेमलता भावेश परमार	पवल–२–१६४९४–२०२२	२९/११/२०२२	सदनिका क्र. ४०१, के विंग, चौथा मजला, बालाजी सिम्फोनी को हौ. सो, मौजे शिलोत्तर रायचूर
१९	फहद रफिक अहमद चौधरी तर्फे कुलमुखत्यारी फरीदा आरीब दलवी	बृन्दाबन बिस्वाल, ज्योस्नाराणी बृन्दाबन बिस्वाल	पवल१–९७९०–२०२२	१८/०८/२०२२	सदनिका क्र. आय २४०५, चोविसावा मजला, बिल्डिंग नं. फेज २ बालाजी सिम्फनी मौजे शिलोत्तर रायचूर
२०	अजय राजकरण सिंह सविता अजय सिंह	रमेश गोपिचंद सिंह	पवल२–१२९७९–२०२३	२५/०७/२०२३	सदनिका क्र. १९, दुसरा मजला, बिल्डिंग नं सी–४, तपोवन को ऑ.हौ.सो.लि. मौजे शिलोत्तर रायचूर
२१	अमोल बाळपुरी गोसावी	बाबुराव तुकाराम सातव	पवल१–०६५३४–२०१२	२५/०५/२०१२	सदनिका क्र ए ०१. ए विंग, तळ मजला, ओम श्री कार्तिक्य गार्डन फेज ३. को ऑ हौ सो लि मौजे शिलोत्तर रायचूर
२२	स्वप्नील मंगेश कांबळे, मंगेश पांडुरंगा कांबळे, मनिषा मंगेश कांबळे	राजेश मधुकर कामतेकर / सुवर्णा राजेश कामतेकर	पवल२– ११५७५–२०२३	५/७/२०२३	सदनिका क्र १०४, पहिला मजला, माऊली दर्शन, मौजे पालीदेवद
२३	श्री. अशोक भगवान पाढी, श्रीम. मंजुळा भगवान पाढी, पूजामाला भगवान पाढी (पुजामाळा जगदीश शाहु	भगवान बी. पाढी	वारस दाखला CIVIL MISC APPLN NO. ४५५/२०२१	९/७/२०२१	सदनिका क्र. ७, तळ मजला, बि.नं जी २. वसुंधरा को हौ सा शिलोत्तर रायचूर
२४	पुष्पा जनार्दन पाटील, आदेश जनार्दन पाटील, शरयू प्रेमानाथ मोकल युवती अनंत कडव, तिलोत्तमा योगेश कांबळे	कै. जनार्दन रामचंद्र पाटील	वारस दाखला CIVIL MISC APPLN NO: ४६१/२०२१	२८/७/२०२३	ग्रा. पं. घर मिळकत क्र. ८८/१, मौजे पालीदेवद

वरीलबाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पालीदेवद ग्रामपंचायत कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचाराधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असलेस सदर नोटीसीच्या प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत ग्रामपंचायतीच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९ नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

सही/–
(सुदिन धनाजी पाटील)
ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत पालीदेवद,
ता. पनवेल, जि. रायगड

सही/–
(सौ. योगिता राजेश पाटील)
सरपंच
ग्रामपंचायत पालीदेवद,
ता. पनवेल. जि. रायगड

वनडे वर्ल्डकपमध्ये रोहित ठरला भारताचा सर्वांत वयस्कर कर्णधार

मुंबई : प्रतिनिधी

रोहित शर्मा आता एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेतील सर्वांत वयस्कर भारतीय कर्णधार झाला आहे. याआधी मोहम्मद अझरुद्दीन या यादीत पहिल्या क्रमांकावर होता.

रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय क्रिकेट संघाने रविवारी यंदाच्या विश्वचषक मोहिमेला सुरुवात केली आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सामन्यात कर्णधार म्हणून प्रवेश केलेला रोहित विश्वचषकाच्या इतिहासातील सर्वांत वयस्कर भारतीय कर्णधार बनला आहे. ८ ऑक्टोबर २०२३ रोजी रोहित शर्माचे वय ३६ वर्षे १६१ दिवस नोंदले गेले. त्याच्या आधी १९९९च्या क्रिकेट विश्वचषकात भारताचा कर्णधार मोहम्मद अझरुद्दीन हा विश्वचषकातील सर्वांत वयस्कर भारतीय कर्णधार होता. तेव्हापासून सौरव गांगुली, राहुल द्रविड, एम.एस. धोनी, विराट कोहली हे विश्वचषकात कर्णधार झाले, पण ते अझरुद्दीनचा सर्वांत जास्त वयाचा विक्रम मोडू शकले नाहीत. या यादीत २४ वर्षांनंतर रोहितने अझरुद्दीनला मागे टाकत अव्वल स्थान पटकावले आहे.

अझरुद्दीनला टाकले मागे

अझरुद्दीन हा आजपर्यंतचा सर्वांत वयोवृद्ध भारतीय कर्णधार होता. १९९९मध्ये जेव्हा त्याने कर्णधारपद स्वीकारले तेव्हा त्याचे वय ३६ वर्षे १२४ दिवस होते. २००७ क्रिकेट विश्वचषक भारतासाठी एक दुःस्वप्न होते, ज्यात कर्णधार राहुल द्रविड होता, जो २०२३मध्ये मुख्य प्रशिक्षक म्हणून संघाबरोबर होता. २००७च्या विश्वचषकात जेव्हा राहुलने शेवटच्या सामन्यात कर्णधारपद भूषवले तेव्हा तो ३४ वर्ष ७१ दिवसांचा होता.

कर्णधार म्हणून भारताला एकदिवसीय विश्वचषक विजेतपद मिळवून देणाऱ्या महेंद्रसिंह धोनीने २०१५च्या विश्वचषकात शेवटच्या वेळी भारताचे नेतृत्व केले होते. धोनी जेव्हा अखेरच्या विश्वचषकात कर्णधार म्हणून दिसला तेव्हा त्याचे वय ३३ वर्षे २६२ दिवस होते. यानंतर धोनी २०१९चा विश्वचषकही खेळला होता, पण त्याआधीच त्याने कर्णधारपद सोडले होते. २०१९ मध्ये कर्णधार विराट कोहली होता.

विश्वचषकातील सर्वांत वयस्कर भारतीय कर्णधार

- रोहित शर्मा*(२०२३) : ३६ वर्षे १६१ दिवस (रविवारपर्यंत)
- मोहम्मद अझरुद्दीन (१९९९) : ३६ वर्षे १२४ दिवस
- राहुल द्रविड (२००७) : ३४ वर्षे ७१ दिवस
- श्रीनिवासराघवन वेंकटराघवन (१९७९) : ३४ वर्षे ५६ दिवस
- महेंद्रसिंह धोनी (२०१५) : ३३ वर्षे २६२ दिवस

राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत कल्पना ठाकूर प्रथम

उरण : बातमीदार

कोल्हापूर डिस्ट्रिक्ट मास्टर्स ॲक्व्याटिक स्विमर्स असोसिएशनतर्फे आयोजित जलतरण स्पर्धेत कल्पना मधुकर ठाकूर यांनी प्रौढांच्या राज्य व जिल्हा संघटनेतर्फे राज्यस्तरीय स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळवून गोल्ड पदक मिळविले आहे.

त्यांनी फ्री स्टाइल, ब्रेस्ट स्ट्रोक, बॅक स्ट्रोक, रिले अशा अनेक प्रकारांमधून त्यांच्या वयाच्या ७८व्या वर्षी दोन गोल्ड व दोन सिल्व्हर पदके पटकावली आहेत. स्पर्धेत २२ जिल्ह्यातील एकूण ४०० स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. विजेत्यांना एलआयसीचे मार्केटिंग व्यवस्थापक प्रताप नलवडे, चेंबर ऑफ कॉमर्सचे माजी अध्यक्ष आनंद माने, डॉ. उद्धव पाटील, अनिल निकम, डॉ. शशिकांत शिंदे यांच्या हस्ते गौरवण्यात आले.

या वेळी संघटनेचे एन. एस. कुलकर्णी, आर. ए. हिरकुडे, चंद्रकांत मगदूम, शैलेश प्रभू, विलास चौगुले, ॲड. अर्जुन पाटील, पांडुरंग काटकर उपस्थित होते. मुख्य पंच मानसिंग पाटील यांच्यासह सहकाऱ्यांचा सत्कार झाला.

पुणे संघाने सर्वाधिक मेडल मिळवून विजेतपद पटकाविले त्यामुळे राज्य संघटनेतर्फे पुणे संघाला गौरवण्यात आले. व्ही. जी. कुलकर्णी यांनी सर्वांचे आभार मानले.

राशिद खानकडून वर्ल्डकपमधील सर्व मॅच फी भूकंपग्रस्तांना दान

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

अफगाणिस्तानचा फिरकी गोलंदाज राशिद खान याने विश्वचषक स्पर्धेत मिळालेली संपूर्ण मॅच फी भूकंपग्रस्तांच्या मदतीसाठी दान करण्याचा निर्णय घेतला आहे. राशिदने त्याच्या अधिकृत ट्विटर अकाउंटवरून याची घोषणा केली आहे.

रशिदने ट्वीट केलेल्या पोस्टमध्ये लिहिले आहे की, अफगाणिस्तानच्या पश्चिमेकडील प्रांतांमध्ये (हेरत, फराह आणि बादघिस) झालेल्या भूकंपाच्या दुर्घटनेबद्दल ऐकून मला खूप दुःख झाले आहे. भूकंपामुळे प्रभावित झालेल्यांना मदत करण्यासाठी मी माझे सर्व प्रयत्न समर्पित करीत आहे. क्रिकेट विश्वचषक २०२३ची मॅच फी दान करीत आहे. आम्ही लवकरच एक फंड रेजिंग मोहीम सुरू करणार आहोत, ज्याद्वारे आम्ही पीडितांना मदत करू शकणाऱ्या लोकांकडून मदत घेऊ.

अफगाणिस्तानमध्ये एक भयानक भूकंप झाला, ज्यामुळे सर्वत्र विध्वंसाचे दृश्य पसरले. अफगाणिस्तानमध्ये उपस्थित असलेल्या तालिबान सरकारच्या म्हणण्यानुसार या भूकंपामुळे आतापर्यंत दोन हजारहून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. नऊ हजारपेक्षा जास्त लोक जखमी झाले आहेत आणि १३ हजारहून अधिक घरे उद्ध्वस्त झाली आहेत.

अफगाणिस्तानातील या भूकंपामुळे मृत आणि जखमी झालेल्यांची संख्या सातत्याने वाढत आहे. दुसरीकडे अफगाणिस्तानचा सुपरस्टार रशीद खान सध्या भारतात आयसीसी एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक खेळत आहे, परंतु त्याला आपल्या देशवासीयांची खूप काळजी आहे. म्हणूनच त्याने विश्वचषकाची संपूर्ण मॅच फी दान करण्याचा निर्णय घेतला आहे.

दापोली-पारगाव माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थिनींचे यश

पनवेल : रामप्रहर वृत्त

तालुक्यातील दापोली–पारगाव येथील रयत शिक्षण संस्थेच्या अनंत पांडुरंग भोईल माध्यमिक विद्यालय व रघूनाथ जितेकर उच्च माध्यमिक विद्यालययातील १७ वर्षीय वयोगटातील मुलींनी नावडे येथे झालेल्या तालुकास्तरिय कबड्डी स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला असून या विद्यार्थ्यीनींची जिल्हास्तरिय कबड्डी साठी निवड झाली आहे.

या विद्यार्थ्यीनींना क्रीडा शिक्षिका मानसी नाईक यांनी मार्गदर्शन केले होते. यशस्वी विद्यार्थिनींचे प्राचार्य पी. आर. ठाकूर, उपमुख्याध्यापक भर्णूके, पर्यवेक्षिका अनितकर तसेच शाळेचे सर्व शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.

कमळ नागरी पतसंस्थेतर्फे कॅरम स्पर्धा

अलिबाग : प्रतिनिधी

कमळ नागरी सहकारी पतसंस्था आलिबाग यांच्यातर्फे २७ ते २९ ऑक्टोबर या कालावधीत अलिबाग येथे राज्य मानांकन कॅरम स्पर्धा अयोजित करण्यात आली आहे. ही महिती कमळ नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष सतीश पाटील व रायगड जिल्हा कॅरम असोसिएशनचे अध्यक्ष गिरीश तुळपुळे यांनी दिली.

महाराष्ट्र कॅरम असोसिएशनच्या मान्यतेने रायगड जिल्हा कॅरम असोसिएशनच्या सहकार्याने कमळ नागरी सहकारी पतसंस्थेतर्फे ही राज्य मानांकन कॉरम स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. माळी समाज सभागृह, कुरूळ येथे ही स्पर्धा होणार आहे.

पुरुष एकेरी व महिला एकेरी अशा दोन गटात ही स्पर्धा खेळली जाईल. राज्यातील २२ जिल्ह्यांमधून ३०० पुरूष व ४२ महिला खेळाडू स्पर्धेत सहभागी होणार आहेत. स्पर्धेसाठी ४० कॅरमबोर्ड लावण्यात येणार आहेत. स्पर्धेत एक लाख १० हजार रूपयांची रोख पारितोषिके व चषक बक्षीस देण्यात येणार आहेत, तसेच प्रत्येक व्हाईट व ब्लॅक स्लॅमसाठी रोख बक्षीस देण्यात येणार आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंची निवास व भोजनाची व्यवस्था करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र कॅरम असोसिएशनचे अध्यक्ष जितू शहा, महाराष्ट्र कॅरम असोसिएशनचे कार्याध्यक्ष भारत देसल्डा, महाराष्ट्र कॅरम असोसिएशनचे सेक्रेटरी अरूण केदार दोन दिवस या स्पर्धेसाठी उपस्थित राणार आहेत, असे असोसिएशनचे उपाध्यक्ष तथा रायगड जिल्हा कॅरम असोसिएशनचे अध्यक्ष गिरीश तुळपुळे यांनी सांगितले.

डेव्हिड वार्नरने रचला इतिहास

वर्ल्डकपमध्ये सर्वांत कमी डावांत एक हजार धावा पूर्ण

चेन्नई : वृत्तसंस्था

एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत पाचव्या सामन्यात भारत आणि ऑस्ट्रेलिया आमनेसामने आले होते. या भारताविरुद्धच्या साखळी सामन्यात ऑस्ट्रेलियाचा सलामीवीर डेव्हिड वार्नरने फक्त आठ धावा काढताच इतिहास रचला. वॉर्नर एकदिवसीय विश्वचषकात सर्वांत कमी डावांत एक हजार धावा करणारा पहिला फलंदाज बनला आहे. या दरम्यान त्याने सचिन तेंडुलकर आणि एबी डिव्हिलियर्सचा विक्रम मोडला.

डेव्हिड वॉर्नरने चेन्नईच्या चेपॉक मैदानावर भारताविरुद्ध आठ धावा केल्या आणि एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत सर्वांत जलद एक हजार धावा करणारा फलंदाज बनला. वॉर्नरने अवघ्या १९ डावांत ही कामगिरी केली. यासह भारताचा माजी महान क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर आणि दक्षिण आफ्रिकेचा माजी खेळाडू एबी डिव्हिलियर्स यांना मागे टाकले.

याआधी सचिन आणि डिव्हिलियर्स हे एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत सर्वांत जलद एक हजार धावा करणारे फलंदाज होते. या दोघांनीही २० डावांमध्ये हा पराक्रम केला होता, परंतु आता दोघेही संयुक्त दुसऱ्या स्थानावर घसरले आहेत.

ऑलिंपिकच्या यजमानपदासाठी भारत दावेदार -पी. टी. उषा

हांग चौऊ : भारतीय खेळाडूंनी यंदाच्या आशियाई क्रीडा स्पर्धेमध्ये २८ सुवर्णपदकांसह एकूण १०७ पदकांवर मोहोर उमटवत ऐतिहासिक कामगिरी केली. या देदीप्यमान यशानंतर भारतीय ऑलिंपिक संघटनेच्या अध्यक्ष पी. टी. उषा यांनी म्हटले की, केंद्र सरकारकडून २०३६मधील ऑलिंपिकच्या यजमानपदाची तयारी करण्यात येत आहे. मला असे वाटते की, भारत आता यजमानपदासाठी दावेदार म्हणून तयार झाला आहे.

पी. टी. उषा म्हणाल्या, केंद्र सरकार खेळ व खेळाडूंच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न करीत आहे. खेळाडू, प्रशिक्षक, सपोर्ट स्टाफ यांच्या अपार मेहनतीमुळे भारताला आशियाई क्रीडा स्पर्धेमध्ये पदकांची शंभरी ओलांडता आली. २०२४मधील पॅरिस ऑलिंपिकमध्ये भारत जास्त पदके जिंकेल, असा विश्वास आहे.

उरणला उद्यापासून १४ वर्षांखालील मुलांची क्रिकेट निवड चाचणी

अलिबाग : प्रतिनिधी

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे १४ वर्षांखालील मुलांची क्रिकेट निवड चाचणी बुधवारी (दि. ११) व गुरुवारी (दि. १२) ठाणकेश्वर क्रीकेट मैदान भेंडखळ, उरण येथे घेण्यात येणार आहे. या चाचणीतून निवडलेला रायगडचा संघ महाराष्ट्र क्रिकेट असोससिएशनच्या स्पर्धामध्ये सहभागी होईल, अशी माहिती रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते यांनी दिली.

रायगड जिल्ह्यात स्थायिक असलेल्या खेळाडूंनाची निवड चाचणीत प्रवेश दिला जाणार आहे. १ सप्टेंबर २००९नंतर जन्मलेले खेळाडू निवड चाचणीसाठी पात्र ठरतील. चाचणीसाठी येताना खेळाडूंनी आपल्या आधार कार्डाची स्वतःची स्वाक्षरी केलेली झेरॉक्स प्रत व मूळ आधार कार्ड तपासणीसाठी, स्वतःचे दोन रंगीत पासपोर्ट साईज फोटो व जन्मदाखला सोबत आणावेत, त्याशिवाय निवड चाचणीसाठी प्रवेश दिला जाणार नाही.

खेळाडूंनी पांढऱ्या गणवेशात स्वतःच्या किटसह ११ सप्टेंबर रोजी सकाळी ८.३० वाजता चाचणीच्या ठिकाणी मैदानात उपस्थित राहणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी प्रशांत ओक (९८२२४२२६७६), प्रकश पावसकर (७९७७०१२७४१) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन अध्यक्ष चंद्रकांत मते यांनी केले आहे.



॥ दुःखद निधन ॥

वै. ह.भ.प. आनंदी शंकर पाटील

यांचे शनिवार दि. ०७/१०/२०२३ रोजी दुःखद निधन झाले.
तरी त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वर चरणी प्रार्थना.

दशक्रिया विधी (दहावा) सोमवार दि. १६/१०/२०२३ रोजी
श्रीक्षेत्र नाशिक येथे होणार आहे.
व उत्तरकार्य (तेरावा) गुरुवार दि. १९/१०/२०२३ रोजी
राहत्या घरी नेरे येथे होणार आहे.

शोकाकूल
श्री. दत्तात्रेय शंकर पाटील श्री. संजय शंकर पाटील
श्री. संभाजी शंकर पाटील
श्रीमती राजश्री राजाराम म्हस्कर
सौ. संगिता प्रल्हाद पाटील सौ. रजनी भरत ठाकूर
व पाटील परिवार, नेरे

टिप : कोणत्याही प्रकारचे दुखवटे स्विकारले जाणार नाही तसेच कोणीही जेवण आणू नये.
मु. पो. नेरे, ता. पनवेल, जि. रायगड.

कार्यक्रम

मंगळवार दि. १०/१०/२०२३ रोजी सायं. ७ ते ९ वा. श्री दत्त प्रासादिक भजन मंडळ, वावंजे
बुवा – विष्णुबुवा दाढावकर, पखवाज – धिरज दाढावकर

बुधवार दि. ११/१०/२०२३ रोजी सायं. ७.०० ते ९.०० वा. श्री हनुमान प्रासादिक भजन मंडळ, पडघे
बुवा – संगितरत्न शंकुनाथबुवा पडघेकर, पखवाज – किशोर पाटील

गुरुवार दि. १२/१०/२०२३ रोजी सायं. ७०० ते ९०० वा श्रीपती प्रसादिक भजन मंडळ, डिकसळ – कर्जत
बुवा –कैलासबुवा पाटील, पखवाज –परेश पाटील, तबला – वैष्णव पाटील

शुक्रवार दि. १३/१०/२०२३ रोजी सायं. ७.०० ते ९.०० वा. श्री दत्त प्रासादिक भजन मंडळ, आदई
बुवा – गणपतबुवा म्हात्रे (खांदा), पखवाज – चेतन पाटील (वावंजे)

शनिवार दि. १४/१०/२०२३ रोजी सायं. ७.०० ते ९.०० वा श्री हनुमान प्रासादिक भजन मंडळ, नेरे
बुवा – भजनरत्न महादेवबुवा शहाबाजकर,
पखवाज – निखील मांडवकर, तबला – गौरव म्हात्रे

रविवार दि. १५/१०/२०२३ रोजी सायं. ७.०० ते ९.०० वा. श्री विठ्ठल प्रासादिक भजन मंडळ, वाजे
बुवा –हरिचंद्रबुवा वाजेकर,
पखवाज – संतोष मसणे, तबला – यश भोईर

सोमवार दि. १६/१०/२०२३ रोजी सायं. ७.०० ते ९.०० वा श्री ग्रामदेवता प्रासादिक भजन मंडळ, नेरे
बुवा – रुपेश पाटील,
पखवाज – परेश पाटील, तबला – कल्पेश पाटील

मंगळवार दि. १७/१०/२०२३ रोजी सायं. ७.०० ते ९.०० वा. श्री हनुमान प्रासादिक भजन मंडळ, जामरुग–बीड
बुवा – केशवबुवा तांडेल, पखवाज – हरिष मिसाळ

बुधवार दि. १८/१०/२०२३ रोजी सायं. ७.०० ते ९.०० वा श्री हनुमान प्रासादिक भजन मंडळ, पारगांव
बुवा – शशिकांतबुवा पारगांवकर,
पखवाज –धनंजय खुटले, तबला – शुभम सकपाळ

सायं. ९.०० ते ११.०० वा. श्री डांगरणेश्वर प्रासादिक भजन मंडळ, मोरवे
बुवा – महेशबुवा पाटील, सुरेश उलवेकर, रामदास म्हात्रे,
रमेश नावडेकर, पखवाज उत्तम उलवेकर, मोहन शेळके

गुरुवार दि. १९/१०/२०२३ रोजी सकाळी १०.०० ते १२.०० वा.
किर्तन – ह.भ.प. श्री. ज्ञानेश्वर महाराज पारधी (वांद्रे–शहापूर)
पखवाज – धनंजय खुटले (नेरेपाडा)

जीवेत् शरदः शतम्!
अनिकेत पाटील
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
नशीब कांबळे

जीवेत् शरदः शतम्!
संतोष कोकाटे
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
अजय पाटील, रईस शेख

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com